# UNO ची प्रमुख अंगे (सहा)

1) महासभा (General Assembly) - ~~कार्यालय~~ - न्यूयॉर्क

2) सुरक्षा मंडळ (Security Council)

3) आर्थिक आणि सामाजिक मंडळ (Economic & Social council)

4) विश्वस्त मंडळ (Trusteeship Council)

5) आंतरराष्ट्रीय न्यायालय (International Court of Justice)

6) सचिवालय (Secretariat)

• संयुक्त राष्ट्रांची उपांगे (Specialised Agencies)

एकूण 16 उपांगे आहेत

1. आंतरराष्ट्रीय अणुशक्ती संघटना
2. आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (ILO)
3. अन्न (खाद्य) व शेतकी (कृषी) संघटना (FAO)
4. शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना (UNESCO)
5. जागतिक आरोग्य संघटना (WHO)
6. जागतिक बँक (पुनर्रचना व विकासासाठी) (I.B.R.D)
7. आंतरराष्ट्रीय विकास संस्था
8. भांडवल पुरवठा संस्था (I.F.D.)
9. आंतरराष्ट्रीय नाणे निधी (I.M.F.)
10. आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतुक संघटना
11. आंतरराष्ट्रीय टपाल संघटना
12. दुरध्वनी संपर्क संघटना (I.T.U.)
13. जागतिक हवामान संघटना (WMO)
14. नागरी वाहतुक सल्लागार संघटना
15. जकात आणि व्यापार करार (G.A.T.T.)
16. आंतरराष्ट्रीय प्रवास संघटना

(1) <u>महासभा (General Assembly)</u>

पहिले अंग, जागतिक संसद, सर्वात मोठे अंग, UNO च्या सर्व सभासदांचा समावेश, प्रत्येक राष्ट्रांचे पाची सदस्य व एक कायम प्रतिनिधी, कार्यालय न्यूयॉर्क येथे, सर्व राष्ट्रांचा दर्जा समान, अधिवेशन वर्षातून एकदा भरते, अधिवेशन सुरुवात सप्टेंबरच्या तिसऱ्या मंगळवारी, अधिवेशन तीन महिने चालते

बहुसंख्य सदस्य व सुरक्षा समितीच्या विनंतीवरून खास अधिवेशन. दरवर्षी नवीन अध्यक्ष, उपाध्यक्ष, सात मुख्य समित्यांचे सभापतींची निवड, कामकाजाच्या मदतीसाठी सात समित्या.

महत्त्वपूर्ण विषयावर $\frac{2}{3}$ बहुमताने निर्णय होतात. व इतर विषयांवर साध्या बहुमताने निर्णय होतात.

<u>अधिकार व कार्य</u>:- (1) विचारविनीमय करणारे मंडळ (2) निःशस्त्रीकरण, शस्त्रीकरण, शांतता व सुरक्षिततेचे पुरक बाबत शिफारस

(3) आंतरराष्ट्रीय वादाविषयी चर्चा व सहकार्यविषयक शिफारशी करणे

(3) महत्त्वपूर्ण विषयांबाबत स्वतः पुढाकार घेऊन शिफारस

(4) इतर विभागांच्या अंदाजपत्रक व अहवालावर चर्चा करणे व मान्यता देणे.

(5) सुरक्षा मंडळाचे अस्थायी सदस्य, विश्वस्त मंडळ सदस्य, आं. न्यायालयाचे न्यायाधीश यांची नेमणूक

(6) सनदेच्या कार्यासाठी नियम बनवणे व सनदेत $\frac{2}{3}$ बहुमताने दुरुस्ती करणे

(7) विविध समित्या व मंडळे नेमणे.

<u>महासमितीत नवीन परिवर्तन</u>:-

* 1947 मध्ये महासभेची छोटी अंतरिम समिती - सुरक्षामंडळावर नजर ठेवण्यासाठी, विशेष अधिवेशन बोलावणे
* 1950 मध्ये "शांततेसाठी ऐक्य (Uniting for Peace) हा ठराव संमत
* वाढते महत्त्व.

(2) सुरक्षामंडळ (Security Council)

आम UNO ची कार्यकारीणी म्हणतात, जागतिक शांतता व सुरक्षितता विषयक कार्याची जबाबदारी, आक्रमक राष्ट्रांविरुद्ध सामुहिक दंडशक्तीचा उपयोग करण्याचे कार्य.

<u>रचना</u>: प्रारंभी सदस्य - 5 कायम व 6 अस्थायी, एकूण 11

1965 ची घटना दुरुस्तीने सदस्य संख्येत वाढ - 5 कायम - 10 अस्थायी एकूण - 15

- दहा <u>अस्थायी सदस्य</u> → <u>पाच</u> आफ्रिका, व आशिया खंडातील, 02 लॅटीन अमेरिका, दोन युरोप, एक पूर्व युरोपातील

<u>बैठक</u>:- आठवड्यातून एकदा, दोन बैठकीतील अंतर 14 दिवसांपेक्षा जास्त नसावे असा संकेत

* सुरक्षा परिषदेतील सल्लागारी समित्या

(1) मिलिटरी स्टाफ कमिटी → लष्करी कारवाईबाबत सल्ला देते
(2) ॲटॉमिक एनर्जी कमिशन → अणुचा शांततापूर्ण वापराचा सल्ला देते
(3) कमिशन फॉर कन्व्हेन्शनल आर्मामेंट → निःशस्त्रीकरणाबाबत सल्ला देते
(4) प्रवेश समिती → नविन राष्ट्रास सदस्यत्वाबाबत सल्ला
(5) ॲडहॉक किंवा प्रासंगिक समिती → विशिष्ट प्रश्नांबाबत सल्ला देण्यासाठी तात्पुरती समिती

* मतदान पद्धती :- कायम सदस्यांना Veto Power.

→ साधारण विषयावर पंधरापैकी नऊ सदस्यांच्या बहुमताद्वारे निर्णय
→ महत्त्वाचे विषय → पंधरापैकी नऊंचे मत आवश्यक मात्र पाच कायम सदस्यांचे होकार आवश्यक.
→ पाच पैकी एखादे कायम सदस्य राष्ट्र मतदान ~~[struck]~~ न करता व तटस्थ राहिले तर त्यास व्हेटो मानले जात नाही.
→ सदस्य राष्ट्रांविरुद्ध प्रश्न चर्चेस आल्यास - त्या राष्ट्रास मतदान करता येत नाही.

* व्हेटोचा उपयोग सर्वप्रथम सोव्हिएत संघाद्वारे केला गेला.

कार्ये :- शांतता व सुरक्षितता, संघर्षाचे निरीक्षण, राष्ट्रांमधील समझौता घडवून आणणे, चौकशी, मध्यस्थी, शिफारशी करणे, शांततेचा व UNO च्या नियमांचा भंग करणाऱ्या राष्ट्रांविरुद्ध कारवाई करण्याचा निर्णय घेणे, नवीन राष्ट्रास सदस्यत्व देणे, तात्पुरते रद्द करणे, महासचिवाच्या नेमणुकीबाबत महासभेस शिफारस, इ.

(3) आर्थिक आणि सामाजिक मंडळ
(Economic and ~~सामाजिक मंडळ~~ Social Council).

→ UNO च्या उद्देश फक्त युद्धास प्रतिबंध घालणे ~~हाच~~ एवढाच नसून संपूर्ण मानवी जीवन सुखी व समृद्ध करणे हे सुद्धा आहे

या मंडळाकडे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक कार्ये सोपविण्यात आले आहे

रचना :- प्रारंभी - 18 सदस्य, 1965 नंतर (घटनादुरुस्ती) 27 सदस्य, सदस्य निवड महासभेद्वारे.

→ 27 पैकी 9 सदस्यांची म्हणजेच $\frac{1}{3}$ सदस्यांची निवड दर 3 वर्षांनी महासभेद्वारे केली जाते,

→ प्रत्येक राष्ट्राचा एकावेळी एकच प्रतिनिधी.

→ निर्णय आधारण बहुमताने, प्रत्येक सदस्यराष्ट्राला एक मत

→ स्वतः हे मंडळ कामकाज नियम बनवते व अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडते.

अधिकार व कार्य :-

मानवी मूल्यांचे रक्षण करणे,

→ निरक्षरता दूर करणे, आरोग्यविषयक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणे

→ जागतिक आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व आरोग्यविषयक विषयांवर अहवाल तयार करून महासभेकडे सादर करणे

→ ~~[illegible]~~ आरोग्य विषयी योजना तयार करणे व त्यानुसार कार्य करणे

या मंडळाच्या प्रयत्नामुळे 10 डिसेंबर 1948 रोजी मानवी मूलभूत अधिकारांची घोषणा करण्यात आली

- मंडळाच्या मदतीसाठी सहाय्यक संस्था व समित्या.

→ चार प्रादेशिक समित्या

(1) युरोपसाठी आर्थिक समिती
(2) आशियासाठी ,,
(3) लॅटीन अमेरिका ,,
(4) आफ्रिकेसाठी ,,

→ या मंडळाने आपल्या कार्यात मागासदेशांतील दारिद्र्य दूर करणे, त्यांना तांत्रिक मदत करणे, बेकारी, उद्योग, स्त्रियांच्या चर्चा, विचारविनिमय करणे, निर्वासितांना मदत करणे यासारखी कार्ये केली आहेत

विशेष उपयोग :- आं. कामगार संघटना, आं. शेतकी व अन्न संघटना, आं. बँक, UNO ची शैक्षणिक वैज्ञानिक व सांस्कृतिक संघटना (UNESCO), आं. वित्त आयोग, आं. मानवी हक्क आयोग ~

ई. उपांगमार्फत मंडळाने आर्थिक व सामाजिक क्षेत्रांमध्ये समाधानकारक कार्य केले आहे.

→ या मंडळाचे कार्य मुळात: कल्याणकारी व विधायक स्वरूपाचे आहे

→ या मंडळाच्या आदेशानुसार सभासद राष्ट्रांचे सरकार व गुंतवणुकीच्या विविध अंगाने आंतरराष्ट्रीय समस्यांचे आर्थिक व सामाजिक दृष्टीने सोडवून [illegible] उपाययोजना सोडवण्याचा प्रयत्न करीत असतात.

## (4) विश्वस्त मंडळ (Trusteeship Council)

UNO च्या देखरेखीखाली अविकसित प्रदेशांच्या कारभार पाहण्यासाठी विश्वस्त मंडळाची योजना करण्यात आली आहे.

विश्वस्त प्रदेशांचे 3 प्रकार

(1) पहिल्या महायुद्धानंतर निर्माण झालेले प्रदेश

(2) दुसऱ्या महायुद्धात शत्रुराष्ट्रांकडून जिंकून घेतलेले प्रदेश

(3) स्वतंत्र राष्ट्रांनी स्वखुशीने विश्वस्त मंडळाकडे विश्वासाने सोपविलेले

[illegible] [illegible] [illegible] [illegible]

रचना :- (1) विश्वस्त राष्ट्रे (2) UNO चे कायम सभासद (3) महासभेकडून निवडलेली राष्ट्रे - ही निवड 3 वर्षांसाठी

कार्य व उद्देश :- (1) या प्रदेशांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय व शिक्षण, सांस्कृतिक विकास, स्वशासन कारभारासाठी योग्य उपाययोजना करणे, विश्वस्त राष्ट्रांकडून आलेल्या अहवालांची व तक्रारींची तपासणी करणे, प्रदेशांना भेटी देण्यासाठी शिष्टमंडळे पाठविणे, अहवाल महासभा व सुरक्षा मंडळाकडे पाठविणे

(5) आंतरराष्ट्रीय न्यायालय :- (International Court of Justice)

स्थान :- नेदरलँड (हॉलंड) - हेग येथे

UNO चे प्रमुख अंग

रचना :- 15 न्यायाधीश

निवड :- महासभा व सुरक्षा मंडळाकडून स्वतंत्रपणे मतदान करून

पात्रता :- उच्च नैतिक चारित्र्य, न्यायिक कार्यात प्राविण्य;
राष्ट्रीय व आं. कायद्यांचे विशेष ज्ञानवान

→ निवड करताना असमतो सर्व सभासद राष्ट्रांना न्याय (योग्य प्रतिनिधीत्व) मिळेल याची दक्षता घेतली जाते

कार्यकाल :- नऊ वर्षे (सामान्यतः काढता येत नाही, पगार कमी करता येत नाही)
स्वतःचे राष्ट्र त्यांना परत बोलावू शकत नाही
14 न्यायाधीशांची मागणी असल्यास राजीनामा,
न्यायासनावर स्वतःच्या देशाचा न्यायाधीश
न्यायालयाच्या कार्यात भाग घेत नाही

→ अध्यक्ष व उपाध्यक्ष - तीन वर्षासाठी

कामकाजाची भाषा :- इंग्रजी, फ्रेंच.

निर्णय :- साधारण बहुमताने, न्यायाधीशांना बहुमतापेक्षा आपले वेगळे मत मांडता येते

गणपूर्ती - नऊ न्यायाधीशांची उपस्थिती आवश्यक
समान मत पडल्यास अध्यक्ष निर्णायक मत देतो
निर्णय अंतिम अपील नसते फक्त फेरतपासणी करता येते.

कार्यक्षेत्र :- विश्वव्यापी (UNO चे सभासद व गैर सभासद)

→ या न्यायालयात स्वयंभू वाद उपस्थित न होते न्यायालय जे संबंधित राष्ट्रांनी येथे उपस्थित करावे मान्य केले असते

कार्ये → संधीची व्याख्या करणे, युद्धापराधी आंतरराष्ट्रीय खटला भरतात व शिक्षा करतात., राष्ट्रांतील वाद सोडविणे
→ महासभा व सुरक्षामंडळ व इतर अंगांना वैधानिक बाबतीत सल्ला हवा असल्यास तो देणे

## (6) સચિવાલય :- (Secretariat)

**સ્થાપનેચા ઉદ્દેશ :-** UNOચે કાર્ય યોગ્યપદ્ધતીને ચાલાવે, વિભિન્ન અંગ વ ઉપાંગાત એકસૂત્રતા રહાવી મ્હણૂન સચિવાલયાચી સ્થાપના

→ એક સચિવ વ ઘણા હજાર નોકરવર્ગ

**રચના :-** **સચિવ :-** → સુરક્ષા સમિતીચ્યા શિફારશીનુસાર મહાસભા નિવડ કરતે

**મહાસચિવ :-** UNOચા મુખ્ય શાસનાધિકારી અસતો.

**કાળ :-** પાચ વર્ષ

→ 1946 મધ્યે નૉર્વેચે ટ્રિગ્વે લી પહિલે મહાસચિવ હોતે

→ सध्याचे महासचिव- ॲंतोनियो गुतेरेस, पद कालावधी : 5 वर्षे

**સચિવાચે કાર્ય વ અધિકાર :-**

→ મહાસચિવ UNOચ્યા કાર્યક્ષમતેસાઠી જબાબદાર

→ સચિવ - મહાસભેલા વાર્ષિક વ પૂરક અહવાલ સાદર કરીત અસતો

→ વાર્ષિક અંદાજપત્રક મહાસભેપુઢે ઠેવતો

→ સર્વ પ્રકારચી માહિતી વ કાર્યવાહી ગોળા કરતે વ અહવાલ તયાર કરતે

→ સચિવાલય - સચિવ, મહાસભા, સુરક્ષા મંડળ, આર્થિક વ સા.- મંડળ ચ્યા બૈઠકીસ માહિતી પુરવિતે

→ વર્ગણી જમા કરણ્યાચે કામ

→ મહાસભેચ્યા નિયમાનુસાર સચિવાલયાતીલ ઇતર નોકરવર્ગાચી નેમણૂક કરીત અસતો

म्हणून राष्ट्रांनी जीवन जगावे आणि सर्वांना भेडसावणारे सामान्य प्रश्न एकत्रितपणे सोडवावेत, तरच विश्वमानवाच्या वर्तमानकालीन वेदना कमी होतील आणि परस्पर-सहकार्यामुळे भविष्यही उज्ज्वल होऊ शकेल. आजचे एकूणच जागतिक वातावरण पाहता विश्वसमाजाची वाटचाल जागतिक शासनाच्या दिशेने सुरू असून विश्वराज्याचे स्वप्नही अशक्य नाही असेही अनेक विद्वानांचे आणि राजकारण्यांचे मत आहे.

★★

## प्रकरण अकरावे

# संयुक्त राष्ट्र संघटना

## ( United Nations Organization)

जगात शांतता आणि सहकार्याचे वातावरण निर्माण करून परस्परांच्या विकासाला हातभार लावणे आणि जगाला युद्धाच्या आण्विक युद्धाच्या महाप्रलयापासून वाचवणे यासाठी संयुक्त राष्ट्रसंघ (UNO) या आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना २४ ऑक्टोबर १९४५ रोजी करण्यात आली. यापूर्वी १९१९ मध्ये पहिले महायुद्ध संपल्यानंतर राष्ट्रसंघ (Leage of Nations) ही पहिली जागतिक संघटना निर्माण करण्यात आली होती. पण दुर्दैवाने या संघटनेला फारसे यश मिळाले नाही अथवा संघटनेतील सदस्य राष्ट्रांनी एकत्रित येऊन परस्परांना सहकार्य केले नाही. त्यामुळे त्यावेळीही व्यापक आणि चांगले उद्देश असूनही 'राष्ट्रसंघ' यशस्वी होऊ शकला नाही. तसेच त्याच्या घटनेत आणि अंगभूत रचनेतही अनेक उणिवा असल्याने त्यावेळेस या संघटनेला यश आलेले नव्हते. हिटलर, मुसोलिनीसारख्या आक्रमक आणि लोकशाहीविरोधी लष्करशहांमुळे १९३९ ते १९४५ या काळात दुसरे जागतिक महायुद्ध झाले. इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका आणि रशिया या मित्र राष्ट्रांनी जर्मनी, इटली आणि जपान या राष्ट्रांचा दारुण पराभव केला. अमेरिकेने तर जपानच्या हिरोशिमा आणि नागासाकी या शहरांवर ६ ऑगस्ट व ९ ऑगस्ट १९४५ रोजी अणुबॉम्बचा प्रथमच वापर करून काही तासातच लक्षावधी लोकांना ठार केले तर लक्षावधी लोकांना कायमचे पंगू-अपंग बनवले. या महायुद्धात फार मोठी मनुष्यहानी आणि वित्तहानी दोन्ही बाजूंच्या राष्ट्रांची झाली.

दुसऱ्या महायुद्धात जर्मनीचे ३२ लाख, राष्ट्रकुलसंघाचे ४५ लाख आणि अमेरिकेचे ३५ लाख सैनिक प्राणास मुकले. त्याशिवाय लाखो सैनिक अपंग झाले. जर्मनीच्या जवळपास दीड कोटीहून जास्त नागरिकांचा संहार झाला. त्याचप्रमाणे इतर मित्र राष्ट्रातील नागरिकही लाखोंच्या संख्येत मृत्युमुखी पडले.

अनेक शहरे उद्ध्वस्त झाली. शहरातील अनेक बिल्डिंग्ज, उद्योगधंदे, कारखाने, औद्योगिक वसाहती, शाळा, रेल्वेमार्ग उद्ध्वस्त झाले. आर्थिकदृष्ट्या त्यांचे मोजमाप करणे फारच कठीण काम आहे. उदाहरणादाखल असे सांगता येईल की, एकट्या

रशियाची ६८० दशकोटी रुबल्सची वित्तहानी झाली. ह्यावरून इतर देशांतील वित्तहानीची कल्पना करता येईल. इतक्या मोठ्या प्रमाणात जीवित व वित्तहानी झाल्यामुळे संपूर्ण जगावर याचे दूरगामी परिणाम होणे स्वाभाविक होते. हुकूमशाही, आक्रमकता, दहशतवाद याद्वारे या महायुद्धामुळे जगातील लोकशाहीपुढे फार मोठे आव्हान निर्माण करून शांतता आणि विकास, मानवतावाद आणि बंधुभाव या संकल्पनांना या महायुद्धात मूठमाती मिळालेली होती. सर्वत्र भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

महायुद्धाची दाहकता महायुद्ध सुरू असतानाच जाणवत होती. युद्धामुळे नुकसानच होत असते, कोणतेही प्रश्न कायमचे सुटत नसतात, शांतता प्रस्थापित करण्यासाठी परस्परचर्चेद्वारेच प्रश्न सोडवले पाहिजेत आणि त्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज असते, हे युद्धातील सर्व प्रमुख राष्ट्रांना युद्ध सुरू असतानाच लक्षात आल्यामुळे हे युद्ध कसे थांबवावे आणि युद्धाच्या विजयानंतर नवी व्यवस्था कशी करावी याचा विचार ही राष्ट्रे करीत होती. जगात शांतता आणि सहकार्याचे वातावरण निर्माण व्हावे, राष्ट्रांनी आपापले प्रश्न चर्चेद्वारे आणि परस्परांच्या सहकार्याने, सहानुभूतीने सोडवावेत यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत असा विचार ही राष्ट्रे करू लागली. पहिल्या जागतिक महायुद्धानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी जो १४ कलमी कार्यक्रम सुचवलेला होता त्यानुसार 'राष्ट्रसंघ' ही पहिली जागतिक संघटना स्थापना झालेली होती. तिला अनेक कारणांनी अपयश आल्यामुळे हे दुसरे जागतिक महायुद्ध झाले. या अनुभवातूनच पूर्वीच्या राष्ट्रसंघ या संस्थेच्या कार्यामध्ये अधिक चांगल्या सुधारणा करून अधिक व्यापक अशी आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन केली पाहिजे असा विचार दुसरे जागतिक महायुद्ध सुरू असतानाच झाला आणि अशा संघटनेच्या स्थापनेचे श्रेय अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट यांच्याकडे जाते. अशी संघटना स्थापन करण्यासाठी जगातील प्रमुख राष्ट्रांच्या नेत्यांच्या अनेक ठिकाणी बैठका, भेटी आणि परिषदा झाल्या. त्यातून 'संयुक्त राष्ट्रसंघ' (United Nations Organization) या जागतिक संघटनेची स्थापना झाली. अशा या प्रमुख घटनांचा संक्षेपाने खालीलप्रमाणे आढावा घेण्यात आलेला आहे.

## ● संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेची पूर्वतयारी ●

'संयुक्त राष्ट्रसंघ' असे नाव अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट यांनीच सुचविले. जगातील मानवाची सुरक्षितता, स्वातंत्र्य आणि अधिकाराचे रक्षण आणि विकास यासाठी आणि शांतता निर्माण करण्यासाठी ही संघटना कार्य करील हे प्रमुख उद्देश समोर ठेवून अशी संघटना स्थापन करण्यासाठी जागतिक नेत्यांकडून प्रयत्न झाले.

१. **जेम्स राजवाड्यामधील घोषणा :-** दुसरे महायुद्ध सुरू असतानाच जर्मनी व इटली यांच्या आक्रमणामुळे विशेषतः निर्वासित राज्ये भयभीत झाली होती. युगोस्लाव्हिया, पोलंड, नॉर्वे, नेदरलँड, लक्झेंबर्ग, झेकोस्लाव्हॅकिया, बेल्जियम, ग्रीस या निर्वासित राज्यांचे प्रतिनिधी सेन्ट जेम्सच्या राजवाड्यामध्ये एकत्र जमले. त्यांनी १२ जून १९४१ या दिवशी एका जाहीरनाम्यावर सह्या केल्या. या घोषणेमुळे शांतता नांदण्याची इच्छा स्पष्ट होते.



२. **अटलांटिक सनद :-** संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या स्थापनेमध्ये अटलांटिक सनद अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जाते. युद्धकाळात प्रमुख दोस्त राष्ट्रांच्या वारंवार परिषदा भरत. त्यांचे संयुक्त जाहीरनामेही प्रसिद्ध होत. त्या जाहीरनाम्यांचा मुख्य उद्देश जगात शांतता प्रस्थापित करावी हा होता. अशा स्वरूपाचा पहिला जाहीरनामा ब्रिटन आणि अमेरिका यांनी १९४१ झाली प्रसिद्ध केला. त्याला अटलांटिक सनद म्हणतात. अटलांटिक सनदेमध्ये सर्व मित्र राष्ट्रांनी मिळून जर्मनीचा पराभव करावा, एकमेकात अनाक्रमण करार करण्यात यावा, कोणत्याही देशाच्या भूप्रदेशात संबंधित जनतेच्या इच्छेशिवाय फेरबदल करू नये, प्रत्येक देशाला त्याच्या इच्छेप्रमाणे शासनपद्धती निवडीचा अधिकार असावा, सर्व देशांना समान वागवावे, आंतरराष्ट्रीय व्यापारात समानता निर्माण करावी, आर्थिक क्षेत्रात सहकार्य करून कामगारांची परिस्थिती सुधारावी. सर्व माणसांना आणि देशांना युद्धापासून मुक्त करावे, सामुद्रिक स्वातंत्र्याचा अधिकार द्यावा, शक्तीचे प्रयोग बंद करावेत, नि:शस्त्रीकरणाचा प्रयत्न करावा अशा तत्त्वांचा समावेश आहे.

३. **संयुक्त राष्ट्रांचे 'घोषणापत्र' :-** अमेरिकेच्या व्हाईट हाऊसमध्ये १ जानेवारी १९४२ रोजी अमेरिकेचे अध्यक्ष रुझवेल्ट तसेच इंग्लंडचे चर्चिल त्याचबरोबर सोव्हिएट संघ आणि चीन यांच्या प्रतिनिधींनी संयुक्त राष्ट्रांच्या घोषणापत्रकावर आपली सही केली. नंतर इतर २२ राष्ट्रांनी सह्या केल्यावर संयुक्त राष्ट्र संघटनेची निर्मिती मान्य झाली. घोषणापत्रावर सही करणाऱ्या राष्ट्रांनी एकमेकांबरोबर सहकार्याने वागणे, तसेच शत्रू राष्ट्रांबरोबर कोणतेही गुप्त करार न करणे याबद्दल शपथ घेतली.

४. **मास्को येथील संमेलन :-** हे संमेलन ३० ऑक्टोबर १९४३ रोजी मास्को या ठिकाणी भरले होते. या संमेलनाला इंग्लंड, अमेरिका व सेव्हिएट संघाचे परराष्ट्र मंत्री आणि मास्कोमधील चीनचा राजदूत हजर होता. या चौघांनी घोषणापत्रावर सही केली. शत्रू पक्षाविरुद्ध संयुक्त कारवाई करावी असे ठरले. जागतिक शांतता व सुरक्षितता यासाठी समतेच्या तत्त्वानुसार एक आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन करावी असे ठरले. या संघटनेत सर्व राष्ट्रांना प्रवेश मिळणार होता. ही संघटना जागतिक शांतता आणि सुरक्षेचे

कार्य करणार होती. यावेळी सोव्हिएट संघाने प्रथमच जागतिक संघटनेच्या स्थापनेत भाग घेतला म्हणून हे संमेलन महत्त्वाचे मानतात.

५. **तेहरान परिषद :-** अमेरिकेचे अध्यक्ष रुझवेल्ट, इंग्लंडचे पंतप्रधान चर्चिल आणि सोव्हिएट संघाचे स्टॅलिन यांची तेहरान येथे डिसेंबर १९४३ मध्ये परिषद भरली. मानवाचे भवितव्य सुरक्षित ठेवावे, जगात शांतता व सुरक्षितता नांदण्याकरिता एक जागतिक संघटना असावी अशी घोषणा यावेळी करण्यात आली. तेहरानमधील या घोषणेला जगाच्या इतिहासात विशेष महत्त्व दिले जाते.

६. **डंबार्टन ओक्स संमेलन :-** इंग्लंड, अमेरिका, चीन आणि सोव्हिएट संघ अशा चार राष्ट्रांचे प्रतिनिधी वॉशिंग्टनजवळच्या डंबार्टन या ठिकाणी एकत्र जमून त्यांनी जागतिक स्तरावरची संस्था स्थापन करण्याचा ठराव मंजूर केला. त्यांनी या संस्थेचे नाव संयुक्त राष्ट्र असे ठेवले. यावेळी संयुक्त राष्ट्रांसाठी एक मसुदा तयार करण्यात आला.

७. **याल्टा परिषद :-** ११ फेब्रुवारी १९४५ या दिवशी इंग्लंडचे चर्चिल, अमेरिकेचे रुझवेल्ट आणि सोव्हिएट संघाचे स्टॅलिन क्रिमियामधील याल्टा या ठिकाणी जमले होते. त्याचप्रमाणे त्यांच्याबरोबर लष्करातील प्रमुख अधिकारी आणि परराष्ट्र मंत्रीसुद्धा हजर होते. त्यांच्या या चर्चेमध्ये जगाच्या स्तरावरील संघटना स्थापन करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. पराभूत झालेल्या जर्मनीवर नियंत्रण ठेवावे, तसेच मोठ्या राष्ट्रांना नकार अधिकार मिळावा असे मान्य केले गेले.

८. **सॅनफ्रान्सिस्को येथील परिषद :-** सॅनफ्रान्सिस्को येथे २२ एप्रिल १९४५ ते २६ जून १९४५ पर्यंत घेण्यात आलेल्या परिषदेला एकूण पन्नास राष्ट्रे हजर होती. या परिषदेला संयुक्त राष्ट्र संघटनेच्या घटना निर्मितीमध्ये विशेष स्थान आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेची सनद तयार करण्याकरिता जगातील सुमारे दोन हजारपेक्षा जास्त तज्ज्ञ हजर होते. या मसुद्यामध्ये डंबार्टन ओक्सचा ठराव मांडण्यात आला होता. सनदेमधील बराचसा भाग २/३ मतांनी मंजूर केला गेला. तसेच समित्या आयोग आणि सुरक्षा मंडळाची रचना ठरविली गेली. तसेच अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, रशिया आणि चीन या बड्या पाच राष्ट्रांना सुरक्षा मंडळात कायमचे स्थान दिले गेले. स्वतंत्र राष्ट्रांनी नकाराधिकाराबद्दल विविध मते मांडल्याने मतभेद निर्माण झाला, पण नंतर नकाराधिकार मान्य केला गेला. सदर संमेलनामध्ये झालेल्या ठरावांच्या प्रती प्रतिनिधी राष्ट्रांना पाठविल्या गेल्या आणि त्यांची मान्यता घेतली गेली. बऱ्याच राष्ट्रांनी मान्यता दिल्यानंतर संयुक्त राष्ट्र संघटना अधिकृतपणे २४ ऑक्टोबर १९४५ रोजी स्थापन झाली.



## • संयुक्त राष्ट्र - 'घोषणापत्र' •
### (United Nations' Charter)

जगातील राजकीय नेते, घटनातज्ज्ञ, मानवतावादी विचारवंत, लेखक आदींच्या विचारमंथनातून संयुक्त राष्ट्रांचे घोषणापत्र अर्थात एक संविधान तयार करण्यात आले. हा एक आंतरराष्ट्रीय करारच होय. या घोषणापत्रावर स्वाक्षरी करून सदस्य होणारे प्रत्येक राष्ट्र या संघटनेचा अविभाज्य घटक म्हणून कार्य करील. या घोषणापत्रात अथवा घटनेमध्ये प्रस्तावनेसह १९ प्रकरणे असून १११ कलमे आहेत. या घोषणापत्राची मूळ प्रत अमेरिकेच्या राष्ट्रीय पुरालेखागारात (युनायटेड स्टेट्स नॅशनल अर्काइव्ह) मध्ये सुरक्षित ठेवण्यात आलेली आहे. युनोचे अस्थायी मुख्य कार्यालय लेक सक्सेस (अमेरिका) येथे करण्यात आले. नंतर न्यूयॉर्क या शहरात हे कार्यालय हलवण्यात आले. आज या संघटनेचे स्वरूप अतिशय व्यापक झालेले असून १९१ राष्ट्रे या संघटनेचे सदस्य आहेत. मुख्य ६ विभाग, १९ विशेष उपविभाग आणि १४ मुख्य कार्यक्रम तसेच प्रासंगिक अनेक उपक्रम, परिषदा असा फार मोठा व्याप असणारी जगातील ही सर्वात मोठी संघटना आहे.

युनोच्या घोषणापत्राची सुरुवात अथवा सनदेच्या प्रस्तावनेचा मसुदा अतिशय व्यापक व उद्‌बोधक असा आहे. त्यात युनोची भूमिकाच स्पष्ट करण्यात आलेली आहे.

**युनोच्या सनदेची सुरुवात —** ''संयुक्त राष्ट्रांचे आम्ही लोक जगात शांतता स्थापन करण्यासाठी, मानवाच्या प्रतिष्ठेचा व योग्यतेचा आदर राखण्यासाठी, राष्ट्राराष्ट्रांत सहकार्य वाढविण्यासाठी, दैनंदिन, आर्थिक व सामाजिक जीवन सुधारण्यासाठी प्रयत्न करू असा निश्चय करतो आणि या हेतूच्या पूर्ततेसाठी सहिष्णुतेचे आचरण करून चांगल्या शेजाऱ्यांप्रमाणे शांततेने एकत्र राहावयाचे आणि आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी आपले बळ एकवटावयाचे तसेच सर्वांच्या हितसंबंधांच्या संरक्षणार्थ शस्त्रास्त्रांचा वापर करण्याखेरीज इतर वेळी शस्त्र व सैन्याचा वापर कुणीही करणार नाही अशी शाश्वती निर्माण करावयाची आणि सर्व लोकांची आर्थिक आणि सामाजिक प्रगती व्हावी म्हणून आंतरराष्ट्रीय यंत्रणा उपयोगात आणावयाची.''

याप्रमाणे सभासद राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्रांच्या वरील सनदेला मान्यता दर्शविली.

## • संयुक्त राष्ट्रांची उद्दिष्टे •

संयुक्त राष्ट्रांच्या सनदेत कलम एकमध्येच या संघटनेच्या उद्दिष्टांचा आशय समाविष्ट असल्याचे आढळते. ही उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत :-

१. आंतरराष्ट्रीय सुरक्षितता व शांतता राखणे, आक्रमण झाल्यास अथवा शांततेचा भंग झाल्यास शांततेच्या मार्गाने व आंतरराष्ट्रीय कायद्याला अनुसरून सामुदायिक उपाय योजणे.

२. सभासद राष्ट्रांनी परस्परात मित्रत्वाचे संबंध स्थापन करणे, हे संबंध समान अधिकार व स्वयंनिर्णयाच्या तत्त्वावर आधारित असतील. सभासद राष्ट्रे जागतिक शांतता दृढ करण्याचा प्रयत्न करतील.

३. आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व मानवीय प्रश्न सोडविण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य मिळविणे, मानवीय हक्क व मानवीय स्वातंत्र्य सर्वांना लिंग, भाषा किंवा धर्माचा विचार न करता उपलब्ध करून देणे.

४. वरील ध्येये साध्य करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांस केंद्र मानून राष्ट्राराष्ट्रांच्या व्यवहारात सुसंवादित्व स्थापन करणे.

## ● संयुक्त राष्ट्रांच्या सनदेची सात मूलतत्त्वे ●
## (The Seven Basic Principles of U.N.Charter)

१. संयुक्त राष्ट्रांची रचना सभासदांच्या सार्वभौम समानतेच्या दर्जानुसार झाली आहे.

२. सर्व सभासद राष्ट्रे सभासदत्वाचे लाभ प्राप्त करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या कर्तव्यांचे पालन करतील.

३. सर्व सभासद राष्ट्रे आपापसांतील आंतरराष्ट्रीय वाद शांततेच्या मार्गाने सोडवतील. हे वाद सोडविताना आंतरराष्ट्रीय शांतता, सुरक्षितता व न्याय यांना धक्का लागू देणार नाही.

४. आंतरराष्ट्रीय संबंधात सर्व राष्ट्रे कोणत्याही राष्ट्रांविरुद्ध सैन्यबळाचा उपयोग करणार नाहीत किंवा तशी धमकी देणार नाहीत. संयुक्त राष्ट्रांच्या उद्दिष्टांच्या विरोधात कुणीही कार्य करणार नाही.

५. सर्व सभासद राष्ट्रे युनोच्या सामूहिक कार्यवाहीला मदत करतील. ज्या राष्ट्राविरुद्ध संयुक्त राष्ट्र उपाययोजना करीत आहे अशा विरोधक राष्ट्रास कोणतेही सभासद राष्ट्र मदत करणार नाही.

६. गैरसभासद राष्ट्रेदेखील आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता राखण्याचा प्रयत्न करतील. या तत्त्वाच्या पालनाची हमी संयुक्त राष्ट्र येईल.

७. संयुक्त राष्ट्र सभासद राष्ट्रांच्या अंतर्गत व्यवहारामध्ये हस्तक्षेप करणार नाही परंतु जेव्हा एखादे राष्ट्र आंतरराष्ट्रीय शांतता भंग करीत असेल किंवा आक्रमक कारवाई



करीत असेल त्यावेळी मात्र संयुक्त राष्ट्रास अंतर्गत हस्तक्षेप करता येईल.

ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सभासद राष्ट्रांवर घटनेच्या दुसऱ्या कलमानुसार खालील जबाबदारी टाकली आहे.

## ● सभासद राष्ट्रावरील जबाबदारी ●

१. कोणत्याही राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्राचे स्वातंत्र्य नष्ट करता येणार नाही किंवा दुसऱ्या राष्ट्राचे अंभगत्व नष्ट करण्यासाठी धमकीचा, बळाचा, शक्तीचा आणि शस्त्रांचा वापर करता येणार नाही.

२. संयुक्त राष्ट्रसंघ ज्या वेळेस एखाद्या आक्रमक राष्ट्राविरुद्ध उपाययोजना करीत असेल अशा वेळी कोणतेही सभासद राष्ट्र आक्रमक राष्ट्राला मदत करू शकणार नाही, परंतु त्याने युनोला मागितलेली मदत देणे हे त्याचे कर्तव्यच राहील.

३. कोणत्याही राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रांच्या अंतर्गत प्रश्नांमध्ये हस्तक्षेप न करणे.

४. युनोच्या सभासद राष्ट्रांनी आपसांतील संघर्षाचे प्रश्न जागतिक शांतता आणि सुरक्षितता ह्यांना धोका पोहोचणार नाही ह्याचाच विचार करून शांततेच्या मार्गाने सोडविणे.

५. प्रत्येक सभासद राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राच्या सार्वभौमत्वाचा समान आदर करणे.

वरील बंधने सभासद राष्ट्रांनी तसेच युनोचे सभासद नसलेल्या राष्ट्रांनीही पाळली तर जागतिक शांतता, सुव्यवस्था निर्माण होऊन युद्धाचे उच्चाटन होईल आणि जगातील सर्व मानवजातीचे सर्वांगीण कल्याण होईल ह्यात शंकाच नाही.

## ● युनोचे सदस्यत्व ●

संयुक्त राष्ट्रसंघटनेचे नव्याने सभासदत्व मिळण्यासाठी अर्ज करावा लागतो. सुरक्षा समितीमधील नकाराधिकार असणारी पाच बडी राष्ट्रे अशा नव्या राष्ट्राला सभासदत्व देण्यासंबंधी निर्णय घेतात. त्यानंतर हा प्रश्न युनोच्या महासभेमध्ये चर्चिला जातो. महासभा त्यास मान्यता देते अथवा मतदानाची आवश्यकता भासल्यास २/३ बहुमत प्राप्त झाल्यानंतर सभासदत्व मिळू शकते. युनोचे सदस्यत्व जगातील सर्व राष्ट्रांनी स्वीकारलेच पाहिजे असे बंधन नाही. तसेच युनोसुद्धा काही विशिष्ट प्रसंगी जे राष्ट्र युनोच्या नियमांचे पालन करीत नसेल त्याचे सदस्यत्व रद्द करू शकते. २००२ पर्यंत स्वित्झरलँड हे राष्ट्र पूर्णपणे अलिप्त राष्ट्र होते. पण २००२ मध्ये त्याने युनोचे सभासदत्व स्वीकारले आहे. आज युनोच्या सदस्य राष्ट्रांची संख्या १९१ असून ही विश्वातील सर्व शक्तिमान अशी महान मानवतावादी संघटना आहे.

**युनोच्या कामकाजाची भाषा :-**

संयुक्त राष्ट्रसंघाचे कामकाज चिनी, इंग्रजी, फ्रेंच, रशियन आणि स्पॅनिश भाषेमध्ये चालते. यांपैकी कोणत्याही एका भाषेतून भाषण अथवा लेखी पत्रव्यवहार केला तर त्याचे इतर सर्व भाषांमध्ये भाषांतर केले जाते. अलीकडे आणखी काही भाषांमध्ये व्यवहार करण्यास मान्यता दिली आहे. त्यात भारताच्या हिंदी भाषेचाही समावेश करण्यात आला आहे.

**संयुक्त राष्ट्रसंघाचे बजेट :-**

युनोच्या घटनेमध्ये १७ व्या कलमानुसार युनोच्या बजेट अथवा उत्पन्न व खर्च या संदर्भात माहिती दिलेली असून युनोच्या सर्व सदस्य राष्ट्रांकडून दरवर्षीची सदस्यता फी आणि अधिकची देणगी घेण्यात येते. दरवर्षीचे नियमित बजेट महासभेद्वारा मंजूर करण्यात येते. युनोचे सरचिटणीस हे बजेट सादर करतात. यासाठी एक १६ सदस्यांची विशेषज्ञ समिती 'दि ॲडवायझरी कमिटी ऑन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ॲंड बजेटरी क्वेश्चन्स' ही पाहणी करते आणि दुसरी एक ३४ सदस्यांची 'कार्यक्रम व समन्वय समिती' युनोच्या जमाखर्चाच्या सर्व बाबींवर नियंत्रण ठेवून मार्गदर्शन करते. महासभेची एक सहाय्यक संस्था 'दि कमिटी ऑन कॉन्ट्रिब्यूशन' ही सदस्य राष्ट्रांकडून निधी जमा करण्याचे कार्य करते. जगातील प्रमुख आणि श्रीमंत राष्ट्रे युनोच्या खर्चाचा जास्तीत जास्त बोजा उचलत असतात. अलीकडच्या माहितीनुसार २०००-२००१ चे स्वीकृत बजेट २ अब्ज, ५३ कोटी, ५० लाख (२,५३,५६,८९,२००) डॉलर्स होते. खालील प्रमुख राष्ट्रे युनोच्या खर्चाच्या प्रतिशत प्रमाणात निधी देतात. अमेरिका - २५%, जापान - २०%, जर्मनी- ९.८५%, इंग्लंड - ५.०९२%, कॅनडा - २.७३%, रशिया - १.०७७%, फ्रान्स- ६.५४%, इटली - ५.४३%, तर भारत - ०.२९९% अशा प्रकारे निधी देतात. जी राष्ट्रे सदस्यता शुल्क देत नाहीत अथवा देण्यास दिरंगाई करतात त्यांना नोटिसा पाठविल्या जातात. प्रसंगी अशा राष्ट्रांचे सदस्यत्व तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्याचे आदेश देण्यात येतात. इ. स. २००२ मध्ये महासभेने अशा २० राष्ट्रांना महासभेमध्ये मतदानापासून वंचित ठेवलेले आहे. ज्यामध्ये अफगाणिस्तान, इराक आणि आफ्रिका खंडातील काही राष्ट्रे यांचा समावेश होतो. मध्यंतरी अमेरिकेने युनोला कमी मदत करण्याचे ठरविल्याने आणि दुसरीकडे युनोचे कार्य वाढल्यामुळे युनो आर्थिक संकटात होती. म्हणून सदस्य राष्ट्रांनी आणि त्यातही श्रीमंतप्रगत राष्ट्रांनी अधिक मदत करावी असे आवाहन युनोचे सरचिटणीस श्री. कोफी अन्नान यांनी केलेले होते.



**युनोचे मुख्य कार्यालय :-**

युनोचे मुख्य कार्यालय अमेरिकेमध्ये न्यूयॉर्क या शहरामध्ये असून त्याला युनोचे 'मुख्य सचिवालय' असे म्हणतात. (यू एन-संयुक्त राष्ट्र-न्यूयॉर्क एन वाय १००१७) अमेरिका -.टेलिफोन : (१-२१२) ९६३-१२३४ वेबसाइट : http: //www.un.org

युनोच्या मुख्य कार्यालयात साधारण १६ हजार कर्मचारी काम करतात. युनोच्या सचिवालयाचे सर्वप्रमुख म्हणून **'सरचिटणीस'** हे सर्वोच्च पद असून आज घानाचे श्री. कोफी अन्नान हे जानेवारी १९९७ पासून ही जबाबदारी अतिशय प्रभावीपणे सांभाळत आहेत.

युनोच्या न्यूयॉर्क येथील मुख्य कार्यालयासोबत आणखी तीन ठिकाणी युनोची महत्त्वाची कार्यालये आहेत.

**संयुक्त राष्ट्र सचिवालय - तीन प्रमुख केंद्रे**

| अनु. | केंद्र | कार्य | आजचे कार्यालय प्रमुख |
|---|---|---|---|
| १. | संयुक्त राष्ट्र कार्यालय, जिनिव्हा (UNOG) | विविध संमेलने - नि:शस्त्रीकरण आणि मानवअधिकारसंबंधी | उपमहासचिव :- व्लादीमीर पेत्रोवस्की (रशिया) |
| २. | संयुक्त राष्ट्र कार्यालय, व्हिएन्ना (UNOV) | आंतरराष्ट्रीय मादक पदार्थ नियंत्रक - न्यायव्यवस्था, आंतरराष्ट्रीय व्यापार नियम निर्मिती केंद्र | उपमहासचिव :- मीनो अरलाची (इटली) |
| ३. | संयुक्त राष्ट्र कार्यालय, नैरोबी (UNON) | पर्यावरण तसेच मानव-कल्याण, निवारा आणि अन्य कार्य | उपमहासचिव :- क्लॉज टापकर (जर्मनी) |

**संयुक्त राष्ट्रसंघाचे प्रमुख विभाग** (Organs of the UNO) **:-**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या घटनेप्रमाणे प्रकरण ३ रे कलम, ७ नुसार युनोची प्रमुख अंगे (Organs of the UNO) एकूण ६ आहेत.

१. महासभा (The General Assembly)
२. सुरक्षा परिषद (The Security Council)
३. विश्वस्त परिषद (The Trusteeship Council)

४. आर्थिक आणि सामाजिक परिषद (The Economic and Social Council)
५. आंतरराष्ट्रीय न्यायालय (The International Court of Justice)
६. सचिवालय (The Secretariat)

या सहा प्रमुख विभागांची संक्षेपाने माहिती घेतल्यास युनोचे कार्य कसे चालते याचा बोध होऊ शकेल.

## १. महासभा-आमसभा (The General Assembly)

संयुक्त राष्ट्रसंघाच्या संविधान कलम ९ ते २२ नुसार (प्रकरण ४ मध्ये) महासभा ही संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्व सभासद राष्ट्रांची प्रातिनिधिक सभा आहे. ह्यामध्ये प्रत्येक सभासद राष्ट्राला पाच प्रतिनिधी पाठविण्याचा अधिकार आहे. असे प्रतिनिधित्व देताना त्या राष्ट्राच्या लोकसंख्येचा, विस्ताराचा वगैरे विचार होत नाही. उदा. भारताचे पाच प्रतिनिधी तसेच बर्माचे, थायलंडचे ही प्रत्येकी पाचच प्रतिनिधी इथे असतात. कोणत्याही राष्ट्राला युनोचे सभासदत्व मिळाले की आमसभेचे आपोआप सभासदत्व प्राप्त होते. ह्याशिवाय प्रत्येक राष्ट्राला आपले पाच पर्यायी प्रतिनिधी, आवश्यक तेवढे सल्लागार आणि तज्ज्ञ मंडळी पाठविण्याचाही अधिकार आहे.

त्यामुळे महासभेची सभासद संख्या अनिश्चित आहे. प्रतिनिधीच्या गैरहजेरीतच पर्यायी प्रतिनिधी महासभेच्या अधिवेशनास उपस्थित राहू शकतात.

युनोच्या महासभेचे कार्यालय न्यूयॉर्क येथे 'लेक सक्सेस' ह्या ठिकाणी आहे.

### महासभेचे अधिवेशन :-

महासभेचे प्रतिवर्षी अधिवेशन भरते. असे अधिवेशन दरवर्षी दोन सप्टेंबरनंतर येणाऱ्या तिसऱ्या मंगळवारीच सुरू होते आणि ते साधारणतः त्याच वर्षाच्या डिसेंबर महिन्याच्या मध्यापर्यंत चालते.

### महासभेचे अतिरिक्त अधिवेशन :-

१) सुरक्षा समितीमधील नऊ सभासद राष्ट्रांनी विनंती केल्यास किंवा २) महासभेच्या बहुसंख्य सभासदांनी विनंती केल्यास महासभेचे अतिरिक्त किंवा विशेष अधिवेशन केव्हाही भरते. असे अधिवेशन महासभेचा सरचिटणीस केवळ चोवीस तासांची पूर्वसूचना देऊन बोलावीत असतो. उदा. फिलिपाइन्सच्या समस्येच्या वेळी, इस्रायल संघर्षाच्या वेळी, भारत-पाकिस्तानच्या संघर्षाच्या वेळी अशी अतिरिक्त अधिवेशने बोलावली होती. महासभेतील मतदान — महासभेत प्रत्येक सभासद राष्ट्राचे पाच प्रतिनिधी असले तरीही प्रत्येकाला मतदानाचा अधिकार नाही. सभासद राष्ट्रालाच मतदानाचा अधिकार आहे. सभासद राष्ट्राला एकच मत असते. ते मत राष्ट्राच्या पाच प्रतिनिधींपैकी ज्येष्ठ सभासद प्रदर्शित करतो.



पुढील परिस्थितीतच महासभेला उपस्थित आणि मतदान करणाऱ्या सभासदांच्या दोन तृतीयांश बहुमताने निर्णय घ्यावा लागतो.

१. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापित करण्याच्या शिफारशी.
२. सुरक्षा समितीतील अस्थायी सुरक्षितता प्रस्थापित करण्याच्या शिफारशी.
३. आर्थिक व सामाजिक समितीमधील सभासदांची निवड करणे.
४. विश्वस्त परिषद मंडळातील सभासदांच्या निवडणुकीच्या बाबतीत.
५. नवीन राष्ट्राला युनोचे सभासदत्व देण्याच्या बाबतीत.
६. एखाद्या सभासद राष्ट्राचे सभासदत्व रद्द करण्याबाबत वरील बाबी सोडून इतर बाबतीत महासभा उपस्थित आणि मतदान करणाऱ्या सभासदांच्या साध्या बहुमताने निर्णय घेते.

### महासभेचा अध्यक्ष आणि उपाध्यक्ष :-

महासभा आपल्या प्रतिवर्षीच्या पहिल्याच अधिवेशनामध्ये साध्या बहुमताने एक अध्यक्ष आणि उपाध्यक्ष ह्यांची निवड करते. अशा वेळी सभासद राष्ट्राला प्रत्येकी एकच मत असते. तसेच ७ विविध समित्यांच्या अध्यक्षांची निवड केली जाते.

अध्यक्ष आणि सातही उपाध्यक्षांचा कार्यकाल फक्त एक वर्षाचाच असतो. महासभेच्या अधिवेशनाच्या वेळी अध्यक्ष म्हणून कार्य करणे आणि नियमानुसार महासभेचे कामकाज चालविणे हेच अध्यक्षाचे कार्य आहे.

अध्यक्ष आणि उपाध्यक्षाच्या निवडणुकीसाठी मोठ्या आणि शक्तिशाली राष्ट्रांनी उदा. अमेरिका, रशिया, चीन, इंग्लंड, फ्रान्स इत्यादींनी आपले उमेदवार उभे करू नये असा अलिखित नियम आहे.

### सभासद राष्ट्राचे शुल्क :-

युनोच्या प्रत्येक सभासद राष्ट्राला सभासदत्वाची काही ठराविक रक्कम सभासद शुल्क म्हणून प्रतिवर्षी द्यावीच लागते. ती रक्कम ठरविण्याचा अधिकार महासभेला आहे. ह्या सभासदांच्या वर्गणीतूनच युनोचा सर्व खर्च होतो. एखाद्या सभासद राष्ट्राने सतत दोन वर्षे असे सभासद शुल्क दिले नाही तर त्या राष्ट्राचा मतदानाचा अधिकार महासभा स्थगित करू शकते.

## ● महासभेचे अधिकार आणि कार्य ●

### (Power and Functions of The General Assembly)

महासभेची कार्ये पाच प्रकारची आहेत. त्यांचा विचार पुढीलप्रमाणे केला आहे.

**१. विचारविनिमयात्मक कार्ये (Deliberative Functions) :-**

अ) जाहीरनाम्यात सांगितलेल्या आणि युनोच्या घटक संस्थांसंबंधीच्या कार्यांबाबत चर्चा करणे.

ब) जागतिक शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापिण्यांसाठी सभासद राष्ट्राने सुरक्षा समितीने केलेल्या शिफारशींचा विचार करणे.

क) जागतिक शांतता आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणत्याही महत्त्वाच्या प्रश्नासंबंधी सुरक्षा समितीचे लक्ष वेधणे.

ड) कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता मानवजातीचा सर्वच क्षेत्रांत विकास करण्यासाठी उपाययोजना सुचविणे. उदा. सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्य, शैक्षणिक इत्यादी.

**२. नियंत्रणात्मक कार्ये (Supervisory Functions) :-**

अ) युनोच्या सर्व घटक संस्थांवर देखरेख ठेवणे.

ब) सुरक्षा समिती, आर्थिक व सामाजिक समिती, विश्वस्त समिती, आंतरराष्ट्रीय न्यायालय इत्यादींच्या वार्षिक अहवालावर विचार करणे. (असा वार्षिक अहवाल ह्या घटक संस्थांनी महासभेला पाठवावा लागतो.)

क) सचिवालयातील कर्मचाऱ्यांच्या नेमणुकांना मान्यता देणे.

**३. आर्थिक कार्ये (Financial Functions) :-**

अ) युनोचे अंदाजपत्रक विचारविनिमय करून मंजूर करणे.

ब) संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या संघटनांची अंदाजपत्रके आणि आर्थिक व्यवहारांना मंजुरी देणे.

क) सभासदत्वाची वर्गणी निश्चित करणे.

ड) सभासद राष्ट्राने सतत दोन वर्षे वर्गणी किंवा सभासदत्वाची फी न दिल्यास त्याचा मतदानाचा अधिकार स्थगित करणे किंवा सभासद राष्ट्राच्या आर्थिक अडचणींचा विचार करून त्याला मतदानाचा अधिकार देणे आणि वर्गणी भरण्याच्या कालावधीत वाढ करणे, सूट देणे इत्यादी अधिकार महासभेला आहेत.

**४. निवडणूकविषयक कार्ये (Electional Functions) :-**

अ) सुरक्षा समितीमधील दहा अस्थायी सभासदांची दोन वर्षे ह्या कालावधीसाठी निवड करणे.

ब) विश्वस्त मंडळातील सभासदांची निवड करणे.

क) सुरक्षा समितीच्या शिफारशीवरून आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे न्यायाधीश, संयुक्त राष्ट्रसंघाचे सरचिटणीस ह्यांची निवड करणे.

ड) आर्थिक व सामाजिक मंडळातील सदस्यांची निवड करणे.

इ) सुरक्षा समितीच्या शिफारशीच्या आधारावर विचार करून नवीन राष्ट्राला युनोचे सभासदत्व देणे.

**५. संविधानविषयक कार्ये (Constitutional Functions) :-** युनोच्या जाहीरनाम्यात दुरुस्ती करणे. ह्यासाठी महासभेने दोनतृतीयांश मताने ठराव पास केला पाहिजे आणि त्याला सुरक्षा समितीच्या पाचही स्थायी राष्ट्रांची संमती आणि सुरक्षा समितीतील बहुसंख्य सभासदांची संमती मिळाली पाहिजे.

प्रत्येक वर्षीच्या नियमित सत्राच्या सुरुवातीला जगातील निवडक अशा प्रमुख राष्ट्रांचे राष्ट्राध्यक्ष, पंतप्रधान अथवा शासनप्रमुख यांनी आंतरराष्ट्रीय समस्यांबद्दल, संबंधांबद्दल व पुढील कार्याची दिशा देणारी भाषणे करण्याची प्रथा आहे. महासभेसमोर जगाच्या वेगवेगळ्या भागांतील राष्ट्रांचे नेते यानिमित्ताने आपले विचार मांडतात. त्यांच्या भेटीगाठी होतात. यामुळे जगासमोरील प्रश्न सोडविण्यास फार मोठी मदत होते. विविध महत्त्वाचे प्रश्न चर्चिले जातात. याचे एक उदाहरण म्हणजे १९९४ मध्ये झालेल्या महासभेच्या अधिवेशनात १६२ विषय मांडण्यात आलेले होते. महासभेचे सचिवालयाने मग या सर्व विषयांची विभागणी मुख्य सहा भागांमध्ये करून ती सहा समित्यांकडे सोपविण्यात येते. या सहा समित्या पुढीलप्रमाणे आहेत :

१. नि:शस्त्रीकरण आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षा समिती
२. आर्थिक आणि वित्तीय समिती
३. सामाजिक, मानवीय आणि सांस्कृतिक समिती
४. विशेष राजनैतिक आणि गैर-उपनिवेशवाद समिती
५. प्रशासनिक आणि बजेटीय समिती.
६. विधि समिती

या समित्यांव्यतिरिक्त एक महासमिती असते, जिचे अध्यक्ष महासभेचे अध्यक्ष असतात आणि या समितीच्या सदस्यपदी महासभेचे २१ उपाध्यक्ष, ७ मुख्य समित्यांचे अध्यक्ष आणि १ क्रेडेन्शियल समितीचे अध्यक्ष असतात. महासभेच्या कामकाजावरच, निर्णयांवरच इतर सर्व विभागांचे कार्य चालते, म्हणून महासभेला अतिशय महत्त्व असते.

तरी पण महासभेमध्ये केवळ चर्चाच होतात, म्हणून महासभा आजही फारशी यशस्वी झालेली नाही अशी टीका केली जाते. पण महासभा ही एक प्रकारे जागतिक संसद आहे (वर्ल्ड पार्लमेंट). गेल्या साठ वर्षांपासून महासभा चांगले कार्य करीत आहे. महासभेचे अध्यक्षपद भूषविण्याचा सन्मान भारताच्या श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांना आठव्या अधिवेशनात मिळालेला होता. भारत हा युनोचा संस्थापक सभासद आहे. भारत पारतंत्र्यात असतानाही ३० ऑक्टोबर १९४५ रोजी युनोच्या चार्टरवर त्याने स्वाक्षरी केली. म्हणून भारताचे योगदान युनोच्या विविध समित्यांमध्ये, कार्यामध्ये राहिलेले आहे.

## २. सुरक्षा परिषद (The Security Council)

संयुक्त राष्ट्रसंघाच्या घोषणापत्रातील प्रकरणं सहा ते आठमधील कलम क्रमांक २३ ते ५४ नुसार सुरक्षा परिषदेची निर्मिती करण्यात आलेली आहे. जागतिक शांतता आणि सुरक्षितता निर्माण करून परस्परसहकार्य आणि विकास साध्य करणारे जग निर्माण करावे अशी महत्त्वपूर्ण जबाबदारी या परिषदेवर सोपविण्यात आलेली आहे. या परिषदेच्या आजपर्यंतच्या वाटचालीवरून या परिषदेला 'दुनिया का पुलिसमॅन' असे म्हटले जाते.

युनो स्थापन झाली तेव्हा पाच स्थायी सभासद (अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, रशिया आणि चीन) आणि सहा अस्थायी सभासद असे एकूण अकरा सदस्य होते. पण १९६५ मध्ये घटनेत बदल करून सहा अस्थायी सदस्यांच्या ठिकाणी दहा अस्थायी सदस्य करण्यात आले. त्यामुळे आज एकूण सदस्यसंख्या १५ आहे. दहा अस्थायी सदस्यांची निवड महासभेद्वारा २/३ बहुमताने दोन वर्षांसाठी होत असे. एखाद्या अस्थायी सदस्य राष्ट्राला सलग दुसऱ्यांदा सुरक्षासमितीचा सदस्य होता येत नाही.

पाच कायमस्वरूपी सदस्य असणाऱ्या राष्ट्रांना 'नकाराधिकार' (VETO) चा अधिकार आहे. म्हणजेच या पाच महाशक्तिशाली राष्ट्रांचे एकमत झाल्याशिवाय कोणतेही निर्णय होत नाहीत. म्हणजेच सुरक्षा परिषदेत कोणत्याही प्रश्नावर १४ राष्ट्रे एकीकडे आणि नकाराधिकार असणारे कोणतेही १ राष्ट्र जरी विरुद्ध असेल तरी तो निर्णय मान्य होऊ शकत नाही. यामुळे अनेक वेळा जागतिक प्रश्न सोडवण्यामध्ये यशही मिळाले आहे आणि अडथळाही निर्माण झालेला आहे. भारताला मात्र रशियाने वापरलेल्या नकाराधिकारामुळे फायदा झालेला आहे. १९४८ मध्ये पाकिस्तानने जम्मू काश्मीरमध्ये हस्तक्षेप केला त्यावेळी भारताने तिथे युद्ध केले तेव्हा हा प्रश्न युनोच्या सुरक्षा परिषदेत गेला. पाकिस्तान, अमेरिका आदींनी भारतालाच आक्रमक ठरविण्याचा पवित्रा घेतला होता. तसेच १९६१ मध्ये गोवा मुक्ति-लढ्याच्या प्रसंगी पोर्तुगालनेही अशीच ओरड



केलेली होती. गोवा हा भारताचा अविभाज्य भाग आहे असे मत रशियाने सुरक्षा परिषदेत व्यक्त करून या प्रश्नावर आपल्या 'नकाराधिकार' या विशेष अधिकाराचा वापर केला. त्यामुळे भारताचे हितसंबंध सुरक्षित राहू शकले. अन्यथा भारताला मोठा संघर्ष करावा लागला असता. म्हणून रशियाला आपण भारताचा खराखुरा हितचिंतक व मित्र समजतो. भारताला सुरक्षा समितीमध्ये अस्थायी सभासद म्हणून तीन-चार वेळा कार्य करण्याची संधी मिळालेली आहे. शिवाय भारताने 'नकाराधिकार' असणाऱ्या राष्ट्राचा दर्जा आपणास मिळावा म्हणून गेल्या काही वर्षांपासून प्रयत्न चालवले आहेत आणि त्यास ब्रिटन, फ्रान्स, रशिया आणि चीन या व्हेटो पॉवर असणाऱ्या राष्ट्रांनी आणि इतर अनेक राष्ट्रांनी मान्यता दिलेली आहे. आता केवळ अमेरिका, पाकिस्तान याच राष्ट्रांची संमती हवी आहे. ती लवकरच मिळेल अशी अपेक्षा आहे. भारतासोबत जपान, जर्मनी आणि ब्राझील या राष्ट्रांनीही नकाराधिकाराची मागणी केलेली आहे.

**सुरक्षा समितीचा अध्यक्ष :-**

सुरक्षा समितीमधील सभासद राष्ट्रे आपल्यामधूनच एका सभासदाची निवड अध्यक्ष म्हणून करतात. अशा अध्यक्षाची निवड सभासद राष्ट्रांच्या इंग्रजी आद्याक्षरांनुसार होते. उदा. A अमेरिका, B बेल्जियम, C कॅनडा वगैरे. ह्या अध्यक्षाचा कार्यकाल फक्त एक महिन्याचाच असतो. त्यामुळे पंधरा महिन्यातून प्रत्येक सभासदाला एकदा अध्यक्ष होण्याची संधी आपोआप मिळते.

सुरक्षा समितीची बैठक-दर पंधरवड्यातून एक अशी सुरक्षा समितीची बैठक सतत होते. तिचे मुख्य कार्यालय न्यूयॉर्क येथील 'लेक सक्सेस' ह्या ठिकाणी आहे.

मतदान (Voting) – सुरक्षा समितीच्या सभासदाला एकच मत असते. सर्वसाधारण प्रश्नासंबंधीचा निर्णय पंधरा सभासदांपैकी नऊ सभासदांच्या होकारार्थी मताने घेण्यात येतो.

परंतु जागतिक महत्त्वाच्या प्रश्नांसंबंधीचे निर्णय घेताना ह्या नऊ होकारार्थी मतांमध्ये इंग्लंड, अमेरिका, रशिया, फ्रान्स आणि चीन ह्या पाचही स्थायी राष्ट्रांचे होकारार्थी मत असणे आवश्यक आहे.

ह्या पाचही राष्ट्रांना विशेष अधिकार प्राप्त झाला आहे. त्याला नकाराधिकार (Veto) असे म्हणतात. एखादा ठराव सुरक्षा समितीच्या कक्षेत येत नाही असा ठराव किंवा असे मत दर्शवून किंवा मतदान करताना त्या ठरावाच्या विरोधी मतदान करून ते आपला नकाराधिकार दर्शवू शकतात. असा नकाराधिकार केव्हा आणि किती वेळा वापरावा ह्यावर कोणतेच बंधन नाही. त्यामुळे सुरक्षा समितीच्या एका स्थायी राष्ट्राने नकाराधिकार

वापरला आणि उरलेल्या चौदाही राष्ट्रांनी ठरावाच्या बाजूने मतदान केले तरीही ठराव पास होऊ शकत नाही. आंतरराष्ट्रीय न्यायालयातील न्यायाधीशांची निवड करताना ही स्थायी राष्ट्रे नकाराधिकार वापरू शकत नाहीत.

## ● सुरक्षा समितीचे अधिकार आणि कार्ये ●
## (Powers and Functions of The Security Council)

**सुरक्षा समितीचे अधिकार आणि कार्ये पुढीलप्रमाणे आहेत :-**

**१. विचारविनिमयात्मक कार्ये (Deliberative Functions) :-**

i. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापित करणे.

ii. त्यासाठी जागतिक संघर्षाच्या प्रश्नाचा विचार करणे आणि त्यावर उपाययोजना सुचविणे.

iii. सभासद राष्ट्रांनी असे संघर्षाचे प्रश्न मध्यस्थी, वाटाघाटी, लवाद आणि आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या मार्फत सोडवावेत असा निर्देश देणे.

iv. राष्ट्राराष्ट्रांतील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक प्रश्नांचे अध्ययन करणे. त्याचा अहवाल महासभेला सादर करणे.

v. विश्वस्त प्रदेशाची जबाबदारी स्वत: किंवा अधिकाऱ्यांमार्फत पार पाडणे.

vi. आपल्या कार्याचा वार्षिक अहवाल महासभेला सादर करणे.

**२. अंमलबजावणीची कार्ये (Enforcement Functions) :-**

i. जागतिक संघर्षाचा प्रश्न जर शांततेच्या मार्गाने सुटला नाही तर तो नाकेबंदी, दळणवळण निर्बंध, आर्थिक संबंध तोडणे इत्यादी मार्गांचा अवलंब करून सोडविणे.

ii. तरीही प्रश्न सुटत नसेल तर प्रत्यक्ष लष्करी कारवाई करणे. अशा वेळी सभासद राष्ट्रांना लष्करी सहाय्य द्यावे लागते. उदा. कोरियन युद्धाच्या वेळेस सुरक्षा समितीने लष्करी सहाय्याने हा संघर्षाचा प्रश्न सोडविला होता.

**३. निवडणूकविषयीची कार्ये (Election Functions) :-**

i. नवीन राष्ट्राला युनोचे सभासदत्व द्यावे किंवा नाही अशी शिफारस महासभेला सुरक्षा समितीच करते. त्यानुसारच महासभा नवीन राष्ट्राला सभासदत्व देऊ शकते.

ii. युनोच्या महासचिव पदासाठी योग्य व्यक्तीची शिफारस करणे.



iii. आंतरराष्ट्रीय न्यायालयातील न्यायाधीश पदासाठी अनुभवी व्यक्तीची शिफारस करणे हे सुरक्षा समितीचेच कार्य आहे.

**४. इतर अधिकार (Other Functions) :-**

i. कोणताही भेदभाव न करता जगातील सर्व राष्ट्रांतील व्यक्तींच्या राहणीमानाचा विकास करणे.

ii. मानवी अधिकार आणि मानवी स्वातंत्र्याची जपणूक करणे. त्यासाठी महासभेला सूचना करणे.

iii. युनोच्या इतर घटक संस्थांना आणि संलग्न संस्थांना वेळोवेळी मदत करणे.

iv. आपल्या अधिकारक्षेत्रातील विषयांसंबंधी जागतिक परिषदा भरविणे आणि ते प्रश्न चांगल्या रीतीने सोडविणे. सुरक्षा समिती ही युनोची कार्यकारिणी (Executive Body) आहे. युनोचे धोरण आणि ठराव अंमलात आणण्याची जबाबदारी सुरक्षा समितीचीच आहे. तिला सहाय्य करण्यासाठी १. लष्करी सहाय्य समिती २. नि:शस्त्रीकरण आयोग ३. नवीन सदस्यांना प्रवेश देणारी समिती अशा संस्था निर्माण केल्या आहेत.

## ● सुरक्षा समितीचे मूल्यमापन ●
## (Evaluation of The Security Council)

सुरुवातीच्या काळात इंडोनेशिया, नेदरलँड्स, ग्रीस, बर्लिन, कांगो, अँग्लो-इराणियन तेल संघर्ष असे अनेक प्रश्न सुरक्षा समितीने यशस्वीरीत्या सोडविले. परंतु अलीकडे नि:शस्त्रीकरण, सत्तागटातील संघर्ष, अवकाशातील युद्ध (Star war), इराण-इराक संघर्ष असे अनेक प्रश्न सोडविण्यात सुरक्षा समिती असमर्थ ठरली आहे. ह्याचे कारण आहे :

१. स्थायी राष्ट्रांच्या नकाराधिकाराचा स्वैर आणि स्वार्थी वापर.

२. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या बाहेर राष्ट्राराष्ट्रांनी केलेले प्रादेशिक करार आणि त्यामुळे निर्माण झालेले गटबाजीचे राजकारण उदा. नाटो, सीटो, बगदाद पॅक्ट इत्यादी.

३. आफ्रो-आशियायी राष्ट्रांना बहुसंख्येने महासभेत मिळालेले प्रतिनिधित्व आणि त्यांनी निर्माण केलेला तटस्थ गट.

ह्यामुळे सुरक्षा समिती आपली नियोजित कार्ये करण्यास आज असफल ठरली आहे. त्याकरिता स्थायी राष्ट्रांचा नकाराधिकार रद्द करणे, सुरक्षा समितीमधील सभासदांची संख्या वाढविणे, बहुमताच्या आधारावर निर्णय घेणे व ते सर्वांवर बंधनकारक ठेवणे असे उपाय सुचविले आहेत.

## ३. विश्वस्त परिषद (The Trusteeship Council)

संयुक्त राष्ट्रसंघाने यापूर्वीच्या राष्ट्रसंघातील (लीग ऑफ नेशन्स्) मँडेट व्यवस्थेमध्ये ज्या प्रकारची पद्धती स्वीकारली होती तशीच पद्धती - व्यवस्था युनोच्या या 'विश्वस्त परिषदेत' करण्यात आली. युनोच्या चार्टरमधील १३ व्या प्रकरणातील कलम क्रमांक ८६ ते ९१ मध्ये यासंबंधी तरतूद आहे.

**विश्वस्त समितीची रचना :-**

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सनद ८६ नुसार ह्या समितीमध्ये १. सुरक्षा परिषदेतील सर्व स्थायी सभासद (म्हणजे इंग्लंड, अमेरिका, रशिया, फ्रान्स आणि चीन) २. विश्वस्त प्रदेशात शासन करणारी राष्ट्रे. ३. विश्वस्त प्रदेशांचा शासन कारभार करणाऱ्या राष्ट्रांच्या संख्येएवढेच महासभेचे तीन वर्षांच्या मुदतीसाठी निवडून दिलेले सभासद असे एकूण १८ सभासद विश्वस्त समितीमध्ये असतात.

**अधिवेशन :-** विश्वस्त समितीची दरवर्षी जानेवारी आणि जून महिन्यात अधिवेशने भरतात.

**कार्ये :-** १. संयुक्त राष्ट्र संघटनेने विश्वस्त म्हणून सोपविलेल्या प्रदेशाचा शासन कारभार करणे. २. विश्वस्त प्रदेशातील जनतेचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय असा सर्वांगीण विकास करणे. ३. तेथील परिस्थितीची वेळोवेळी पाहणी करणे आणि त्यासाठी आवश्यक तेव्हा चौकशी मंडळ नेमणे. ४. चौकशी मंडळाच्या प्रशासकाकडून प्रतिवृत्त मागविणे, त्यावर विचार करणे आणि त्यासंबंधीचा अहवाल प्रतिवर्षी महासभेला सादर करणे, ५. विश्वस्त प्रदेशाची प्रगती होताच त्यांना स्वातंत्र्य बहाल करणे.

**विश्वस्त मंडळाची कामगिरी :-**

आतापर्यंत ह्या मंडळाने अनेक लहान राष्ट्रांना स्वातंत्र्य प्राप्त करून दिले आणि त्यांची सर्वांगीण प्रगती करण्यास भरघोस मदत केली. त्या राष्ट्रांना युनोने सभासदत्व प्राप्त करून दिले. उदा. न्यू गिनी, पश्चिम सामोआ, फ्रेंच टोगोलँड, फ्रेंच कॅमरून्स, रुआंडा, टँगानिका, सोमियालँड इत्यादी.

**आक्षेप :-** परंतु कोणता प्रदेश विश्वस्त म्हणून कोणत्या राष्ट्राकडे सोपवावा ह्याचा निर्णय महासभा आणि सुरक्षा समितीतच होतो. तो निर्णय बऱ्याचदा स्वार्थी असतो. तसेच अशा विश्वस्त प्रदेशाला किती अवधीमध्ये स्वातंत्र्य द्यावे, त्याचा विकास किती अवधीत करावा, ह्यासंबंधीचे निश्चित नियम नाहीत. उदा. पॅसिफिक बेटे. अमेरिकेचे हितसंबंध पॅसिफिक बेटांमध्ये गुंतलेले असल्यामुळे त्यांना अजूनही स्वातंत्र्य मिळालेले नाही.



वरील आक्षेप जरी खरे असले तरीही आंतरराष्ट्रीय लोकमताच्या प्रभावामुळे अशा प्रदेशांना उशिराने का होईना परंतु स्वातंत्र्य प्राप्त होतेच, हीच समाधानाची बाब आहे.

विश्वस्त परिषदेच्या नियंत्रणाखाली असलेली बहुतांशी राष्ट्रे आता स्वतंत्र झालेली आहेत. १९९४ मध्ये अमेरिकेच्या पालकत्वाखाली असलेले प्रशांत द्वीप-पलाऊ हे स्वतंत्र झाल्यानंतर आज जवळपास युनो स्थापन झाली तेव्हा जेवढे प्रदेश विश्वस्त समितीकडे होते तेवढे स्वतंत्र झाल्यामुळे या समितीचे कार्य जवळपास संपल्यासारखे आहे. तरी पण ही समिती आजही अतिमागासलेल्या प्रदेशांना मार्गदर्शन आणि सहकार्य करते. या समितीने चांगले कार्य केल्यामुळेच जवळपास ११ राष्ट्रांना स्वातंत्र्य मिळाले, त्यांचा विकास होऊ शकला. स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी त्या देशातील लोक स्वतःचा राज्यकारभार करण्याला चांगले सक्षम झालेले आहेत का हे पाहिले जाते. १९४५ मध्ये विश्वस्त प्रदेशातील जनतेची संख्या २.२५ कोटी इतकी होती. जर असे विश्वस्त मंडळ नसते तर इतर प्रगत राष्ट्रांनी या प्रदेशांना ताब्यात घेऊन त्यांचे शोषण केले असते. म्हणून युनोद्वारे मागास आणि पराधीन प्रदेशांना सक्षम करून त्यांचे स्वातंत्र्य व राष्ट्रीयत्व त्यांना बहाल करण्यात आले. हे युनोचे मोठे यशच म्हणावे लागेल.

## ४. आर्थिक आणि सामाजिक परिषद (The Economic and Social Council)

संयुक्त राष्ट्रसंघाचे हे चौथे अंग अथवा विभाग अतिशय महत्त्वाचे असून युनोच्या ध्येयधोरणांना मानवीय समानतेच्या दृष्टिकोणातून, समान विकासाच्या संधी देण्यासाठी अराजकीय कार्यातील अतिशय महत्त्वाचे कार्य या परिषदेमार्फत केले जाते. युनोच्या घटना कलम ५५ नुसार या समितीची निर्मिती करण्यात आलेली आहे. मानवी जीवन सुखी करण्यासाठी सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विषमता नष्ट करणे, जात, धर्म, भाषा, रंगभेद, वंशभेद, तसेच दारिद्र्य, रोगराई आणि निरक्षरता निर्मूलन, स्त्रियांचा सन्मान अशा क्षेत्रात ही समिती अतिशय प्रभावीपणे काम करते.

महासभेद्वारा २/३ बहुमताने दर ३ वर्षांसाठी एकूण ५४ सदस्य राष्ट्रांची निवड केली जाते. १/३ सभासद दरवर्षी निवृत्त होतात व तेवढेच सदस्य नव्याने भरती केले जातात. युनो स्थापन झाली तेव्हा या परिषदेवर केवळ ११ सदस्य होते. १९६६ मध्ये घटनेत बदल करून ही सदस्यसंख्या २७ करण्यात आली. पुन्हा १९७३ मध्ये युनोच्या सदस्य राष्ट्रांची संख्या वाढल्यामुळे आणि प्रश्न-कार्यही वाढल्यामुळे पुन्हा घटनेत दुरुस्ती करून अधिक राष्ट्रांना या समितीवर काम करता यावे म्हणून २७ वरून ही सदस्य संख्या ५४ करण्यात आली. या समितीवर एकदा सदस्य झालेले राष्ट्र सलग पुन्हा दुसऱ्यांदा

सदस्य होऊ शकते. एका राष्ट्राचा एकच प्रतिनिधी या समितीवर असतो.

या परिषदेचे कार्य-जगाच्या प्रादेशिक विभागात खालीलप्रमाणे विभागीय कार्यालये सुरू करून केलेले आहे. १. ई. सी. ई. युरोपसाठी आर्थिक आयोग, जिनिव्हा. २. एस्कॅप एशिया आणि प्रशांत सागरीय प्रदेशासाठी आर्थिक आणि सामाजिक आयोग बँकॉक. ३. ई. सी. एल. ए. - लॅटिन अमेरिकेसाठी आर्थिक आयोग - सँतियागो - चिली ४. ई. सी. ए. आफ्रिकेसाठी आर्थिक आयोग - अदिस अबाबा. ५. ई. सी. डब्ल्यू. ए. - पश्चिम आशियासाठी आर्थिक आयोग - बगदाद.

**बैठक :-** आर्थिक व सामाजिक समितीची बैठक वर्षातून एकदा भरते. ही बैठक दोन महिन्यांपर्यंत चालते.

न्यूयॉर्क आणि जिनिव्हा ह्या ठिकाणी बैठका होतात.

**कार्ये :-** आर्थिक व सामाजिक समितीच्या कार्याचा उल्लेख युनोच्या सनदेच्या ६२ ते ६६ कलमात केला आहे.

१. **प्रतिवृत्तांचा अभ्यास करणे :-** आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक इत्यादी प्रश्नांचा अभ्यास करणे, निर्वासितांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सोडविणे, स्त्रियांचे आर्थिक मागासलेपण दूर करणे, अविकसित देशातील लोकांचा विकास घडवून आणणे इत्यादींचा अभ्यास ही समिती करते.

२. **विचारविनिमय आणि शिफारशी करणे :-** आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक, आरोग्यविषयक आदी प्रश्नांचा सखोल आणि विस्तृत विचार करणे आणि ते प्रश्न सोडविण्यासाठी आपल्या शिफारशी महासभेला सादर करणे हे तिचेच कार्य आहे.

३. **संकेत, रूढी, प्रथा इत्यादींचे संकलन करणे :-** निरनिराळ्या देशांतील रूढी, प्रथा, संकेत इत्यादींचे संकलन करून त्या मानवी विकासासाठी आवश्यक आहेत किंवा अनावश्यक आहेत त्यासंबंधीचा निर्णय घेणे आणि त्याची शिफारस महासभेला करणे.

४. **जागतिक परिषदा भरविणे :-** वरील सर्व प्रश्न सोडविण्यासाठी राष्ट्राराष्ट्रांचे सहकार्य आवश्यक आहे. त्या दृष्टीने राष्ट्राराष्ट्रांच्या जागतिक परिषदा अशा प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी वेळोवेळी भरविणे आणि तिचे रिपोर्ट महासभेला सादर करणे हे आर्थिक व सामाजिक समितीचे कार्य आहे. उदा. १९४९ सालची जागतिक लोकसंख्या परिषद.

५. **संलग्न संस्थांमध्ये सहकार्य प्रस्थापिणे :-** आर्थिक आणि सामाजिक समितीच्या अंतर्गत पाच प्रादेशिक मंडळे, सहा स्थायी समित्या आणि पंधरा संलग्न



संस्था आहेत. उदा. आंतरराष्ट्रीय मजूर संघटना, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी इत्यादी. ह्या सर्व संस्था आणि समित्या आर्थिक व सामाजिक नियंत्रण आणि मार्गदर्शनाखालीच कार्य करतात. त्यांच्यामध्ये सहकार्य प्रस्थापित करणे हे तिचेच कार्य आहे.

आर्थिक व सामाजिक समिती ही केवळ चर्चात्मक समिती आहे. तरीही युनिसेफ रिफ्यजी फंड, युनायटेड नेशन्स रिलीफ आणि वर्क्स एजन्सी, आरोग्य संघटना (WHO), आंतरराष्ट्रीय टपाल संघ वगैरेंच्या माध्यमातून तिने लक्षणीय कामगिरी केली आहे.

आर्थिक आणि सामाजिक परिषदेच्या विविध सहाय्यक समित्या, आयोग आणि योजना असतात.

**अ) नऊ क्रियात्मक आयोग :-**

१. सांख्यिकीय आयोग २. लोकसंख्या आणि विकास आयोग ३. सामाजिक विकास आयोग ४. मानवाधिकार अयोग ५. महिलांच्या स्थितीसंबंधीचा आयोग ६. मादक द्रव्य आयोग ७. अपराध नियंत्रण आणि अपराध न्याय आयोग ८. विकासासाठी विज्ञान आणि प्राद्यौगिकी आयोग ९. निरंतर विकास आयोग.

**ब) चार तदर्थ समित्या :-**

१. कार्यक्रम व समन्वय समिती २. मानव निवास आयोग समिती ३. गैरसरकारी संघटना समिती ४. लेखा रिर्पोटिंग आंतरराष्ट्रीय मानचिन्ह विशेषज्ञ दल.

**क) विकास योजना :-**

१. नैसर्गिक साधनसामग्री विकासयोजना २. नवीन ऊर्जा आणि विकास योजना ३. आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अधिकरणासाठी विशेषज्ज्ञ संस्था ४. संयुक्त राष्ट्र बालकोश ५. शरणार्थींसाठी युनोचा उच्च आयोग ६. विश्व खाद्य कार्यक्रम तसेच महिलांच्या प्रगतीसाठी आंतरराष्ट्रीय शोध आणि प्रशिक्षण संस्था.

## ● गैरसरकारी संस्था-संघटनांशी संबंध ●

सामाजिक आणि आर्थिक परिषदेच्या घोषणापत्रातच गैरसरकारी संघटना (NGOs) सोबत संबंध ठेवून कार्य करावे असे सुचविण्यात आलेले आहेत. जगातील अशा सर्व क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांचे आणि व्यक्तींचे सर्व प्रकारचे सहकार्य घेऊन मानवाला न्याय मिळवून द्यावा, त्याचा विकास करावा, त्याची नैसर्गिक आणि मानवनिर्मित संकटांपासून मुक्तता करावी असे सुचविण्यात आले. त्यानुसार ही परिषद जगातील प्रमुख अशा २००० हून अधिक गैरसरकारी संघटनांसोबत कार्य करते. युनोच्या या परिषदेचे कार्य हे सतत चालणारे कार्य आहे. गेल्या ६० वर्षांत या क्षेत्रात भरीव कार्य होताना दिसून येते.

## ५. आंतरराष्ट्रीय न्यायालय (The International Court of Justice)

आंतरराष्ट्रीय न्यायालयाची स्थापना हेग-नेदरलँड येथे ३ एप्रिल १९४६ रोजी करण्यात आली. संयुक्त राष्ट्र संघाच्या घोषणापत्रातील १४ व्या प्रकरणात कलम क्रमांक ९२ ते ९६ मध्ये तसेच आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या स्वतंत्र स्टॅच्यूटमध्ये प्रकरण ५ मधील ७० व्या कलमानुसार सविस्तर माहिती दिलेली आहे. यानुसार या न्यायालयातील न्यायमूर्तींची एकूण संख्या १५ असून ते आपल्यातील एकाला अध्यक्ष आणि ३ उपाध्यक्ष म्हणून निवडून देतात. त्यांचा कार्यकाल ३ वर्षांचा असतो. न्यायाधीशांची नियुक्ती महासभा आणि सुरक्षा परिषद यांच्यामार्फत ९ वर्षांसाठी होते. केवळ विद्वत्तेच्या आधारावर ही निवड होऊ शकते. एकदा न्यायाधीश झाल्यानंतर त्याच व्यक्तीला दुसऱ्यांदाही न्यायाधीश होता येते. एका वेळी एका देशाची एकच व्यक्ती न्यायाधीश होऊ शकते. न्यायालयाचे कामकाज चालण्यासाठी ९ न्यायाधीश आवश्यक असतात. न्यायालयाचे कामकाज इंग्रजी आणि फ्रेंच भाषांमध्येच चालते. युनोचा न्यायाधीश होण्यासाठी भारताच्या सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायाधीश होण्यासाठी जी पात्रता आवश्यक असते तीच या ठिकाणी पुरेशी आहे. आंतरराष्ट्रीय न्यायालयामध्ये आजपर्यंत २-३ भारतीय न्यायाधीशांना काम करण्याची संधी मिळालेली आहे. न्यायाधीशाची निवड करताना पाच बड्या राष्ट्रांना नकाराधिकाराचा वापर करता येत नाही.

**न्यायालयाचे अधिकार :-** हे अधिकार पुढील तीन प्रकारचे आहेत :

१. **ऐच्छिक क्षेत्रातील अधिकार :-** हे न्यायालय स्वतःहून कोणतीही केस आपल्याकडे घेऊ शकत नाही. राष्ट्राराष्ट्रांनी आपसांतील संघर्षाचे प्रश्न जर ह्या न्यायालयाकडे सोपविले तरच न्यायालय त्यासंबंधीचा निर्णय देते. परंतु असा निर्णय संबंधित राष्ट्रांवर बंधनकारक असतो.

२. **आवश्यक क्षेत्रातील अधिकार :-** संघर्ष असणाऱ्या राष्ट्रांनी जर आपसांत प्रथम करार केला की, आंतरराष्ट्रीय न्यायालयाचा निर्णय आमच्यावर बंधनकारक राहील, तरच न्यायालय त्या केसचा निर्णय देते आणि तो संबंधित राष्ट्रांवर बंधनकारक राहतो आणि असा निर्णय संबंधित राष्ट्रांनी पाळला नाही तर संयुक्त राष्ट्र संघटना त्यांच्याविरुद्ध योग्य कारवाई करू शकते.

३. **सल्लाविषयक अधिकार :-** महासभा, सुरक्षा समिती आणि सुरक्षा समितीच्या संमतीनुसार इतर संस्था आंतरराष्ट्रीय न्यायालयाला सनदेच्या ८५ व्या कलमानुसार कायदेशीर सल्ला मागू शकतात. असा सल्ला देणे न्यायालयावर बंधनकारक आहे. परंतु सल्ला पाळणे किंवा मान्य करणे अशा संस्थांवर, महासभेवर आणि सुरक्षा समितीवर बंधनकारक नसते.



**मूल्यमापन :-** सुरुवातीच्या काळामध्ये ह्या न्यायालयाने अँग्लो-इराणियन ऑईल डिस्प्यूट, कोलंबिया-पेरू असलायम केस वगैरे बाबतीत महत्त्वपूर्ण निर्णय देऊन जागतिक संघर्षाचे प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडविले, परंतु आज अनेक जागतिक संघर्षाचे प्रश्न हे न्यायालय सोडविण्यास असमर्थ ठरले आहे. उदा. इराक-इराण, भारत-पाकिस्तान, सीरिया-लेबेनॉन, निःशस्त्रीकरण वगैरे. ह्याचे कारण हेच की, राष्ट्राराष्ट्रांनी आपले संघर्षाचे प्रश्न ह्या आंतरराष्ट्रीय न्यायालयाकडे सोपविलेच पाहिजेत आणि त्याचा निर्णय मान्य केलाच पाहिजे असे बंधन राष्ट्रांवर नाही. त्यामुळे आंतरराष्ट्रीय न्यायालय हे निर्णयात्मक न्यायालय नसून ते चर्चात्मक न्यायालय आहे असेच म्हणता येते.

## ६. आंतरराष्ट्रीय सचिवालय (The Secretariat)

संयुक्त राष्ट्रसंघाच्या घोषणापत्रातील प्रकरण १५ मधील कलम ९७ ते १०१ मध्ये सचिवालय आणि महासचिव आदि संदर्भात माहिती देण्यात आलेली आहे. अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरात युनोचे हे मुख्य कार्यालय आहे.

युनोसारख्या जागतिक संघटनेचे प्रचंड असे कार्य, दैनंदिन कामकाज चालविण्यासाठी अतिशय कार्यक्षम अशा प्रशिक्षित कर्मचाऱ्यांसह कार्यालयाची आवश्यकता होती. म्हणून अगदी प्रारंभापासून असे कार्यालय सुरू करण्यात आले. शिवाय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी एक स्टाफ कॉलेज ही (UNSC) स्थापन करण्यात आलेले आहे. आज युनोच्या मुख्य कार्यालयात १६,००० हून अधिक कर्मचारी काम करतात. हे सर्व कर्मचारी युनोच्या सर्व सदस्य राष्ट्रांमधून निवडले जातात. त्यांना शासकीय नियमाप्रमाणे पगार, भत्ते, पदोन्नतीच्या सुविधा असतात. त्यांना संयुक्त राष्ट्रसंघाच्या जाहीरनाम्याशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घ्यावी लागते. तसेच कोणत्याही देशाकडून अगर सरकारकडून माहिती घेणार नाही अगर देणार नाही अशा प्रकारचे लेखी आश्वासन प्रत्येक कर्मचाऱ्याला द्यावे लागते.

सचिवालयाच्या मुख्य अधिकाऱ्यास 'सेक्रेटरी जनरल' अथवा 'महासचिव' असे म्हणतात. त्याची नेमणूक सुरक्षा समितीच्या सर्व स्थायी सभासदांच्या संमतीने शिफारस केल्यानंतर महासभेमध्ये त्या प्रस्तावाला मान्यता दिल्यानंतर होते. आजपर्यंत महासचिव म्हणून अतिशय प्रभावीपणे खालील महनीय मुत्सद्द्यांनी, प्रशासकांनी कार्य केले आहे.

१९४६ पासूनचे युनोचे 'सरचिटणीस'

| अनु. | सरचिटणीसाचे नाव | देश | कालखंड |
|---|---|---|---|
| १. | श्री. ट्रिग्वेली | नॉर्वे | १९४६-१९५३ |
| २. | श्री. डाग हॅमरशील्ड | स्वीडन | १९५३-१९६१ |
| ३. | श्री. ऊ थान्ट | ब्रम्हदेश | १९६१-१९७१ |
| ४. | डॉ. कुर्त वाल्डहाईम | ऑस्ट्रिया | १९७१-१९८१ |
| ५. | श्री. जेवियर पेरेझ-द-क्यूलर | पेरू | १९८१-१९९१ |
| ६. | डॉ. बुद्रुस घाली | इजिप्त | १९९१-१९९६ |
| ७. | श्री. कोफी अन्नान | घाना | १९९७ पासून |

मुख्य सरचिटणीसांच्या मदतीला अंडर सेक्रेटरी, असिस्टंट सेक्रेटरी, कक्ष अधिकारी आणि इतर कर्मचारी तसेच विशेषज्ञ यांचा फार मोठा स्टाफ असतो. महासचिवाने अधिकारपदावर असताना केलेल्या कृतीबद्दल कोणत्याही न्यायालयात दाद मागता येत नाही. महासचिव हे कोणत्याही सदस्य राष्ट्राला भेट देऊ शकतात. त्यांची निवड ही पाच वर्षांसाठी असते. त्यांची सलग दुसऱ्यांदाही निवड होऊ शकते. सध्याचे महासचिव श्री. कोफी अन्नान यांची २००२ मध्ये दुसऱ्यांदा निवड झालेली आहे.

## ● महासचिवाची कार्ये आणि अधिकार ●

१. युनोच्या सचिवालयाचा प्रमुख प्रशासकीय अधिकारी ह्या नात्याने महासभा, सुरक्षा समिती, आर्थिक समिती, विश्वस्त समिती ह्यांच्या बैठकीला उपस्थित राहणे.

२. प्रत्येक बैठकीच्या कामकाजाची नोंद ठेवणे.

३. युनोच्या कामकाजाचा वार्षिक अहवाल तयार करणे.

४. युनोच्या सभासद राष्ट्रांनी युनोला लेखी केलेल्या सूचना, विनंत्या इत्यादी महासभेला आणि सुरक्षा समितीला आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर करणे.

५. निश्चित केलेल्या तारखेस महासभेचे व सुरक्षा समितीचे अधिवेशन बोलावणे आणि त्या अधिवेशनाचा आराखडा तयार करणे.

६. महासभा आणि सुरक्षा समितीने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करणे.

७. युनोच्या घटक संस्था, संलग्न संस्था ह्यांनी संमत केलेले ठराव अंमलात आणणे.

८. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुव्यवस्थेला कोणत्याही कारणामुळे धोका झाल्यास त्याकडे सुरक्षा समितीचे लक्ष वेधणे.



९. अशा वेळी निरनिराळ्या राष्ट्रांमध्ये जाऊन परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करणे आणि त्यांचे प्रतिवृत्त महासभा आणि सुरक्षा समितीला सादर करणे.

१०. सभासद राष्ट्रांची सभासदत्वाची वर्गणी गोळा करणे.

## ● सचिवालयाच्या कार्याचे उपविभाग ●

१. सामान्य कार्यविभाग २. सुरक्षा परिषदेसंबंधी कार्यविभाग ३. आर्थिक विभाग ४. सामाजिक कार्यविभाग ५. विश्वस्त परिषद विभाग ६. सार्वजनिक सूचना विभाग ७. संमेलने परिषदा-अभ्यासगट आणि सामान्य सेवा विभाग ८. विधी अथवा कायदेविषयक विभाग

अशा प्रत्येक विभागाला एक उपमहासचिव असतात. शिवाय एक प्रमुख उपमहासचिव आहेत. सध्या या पदावर कॅनडाचे श्री. लुइस फ्रेचिट हे कार्य करीत आहेत.

युनोचे कार्य हे फार मोठ्या प्रमाणात चालते. त्यासाठी प्रशासनिक विभाग अनेक आहेत. त्यातले मुख्य विभाग म्हणजे —

१. 'प्रशासनिक समन्वय समिती' (Administrative Committee on Coordination-ACC) या समितीच्या अध्यक्षपदी महासचिव असतात. युनोच्या सर्व कार्यांचे समन्वय साधण्याचे कार्य या समितीमार्फत होते. इतर काही प्रमुख विभाग पुढीप्रमाणे आहेत.

२. विधीविषयक कार्यालय (Office of Legal Affairs-OLA)

३. राजनीतिक कार्य विभाग (Department of Political Affairs-DPA)

४. नि:शस्त्रीकरण कार्य विभाग (Department of Disarmament Affairs-DDA)

५. शांतता स्थापनेसाठीचा कार्यवाही विभाग (Department of Peacekeeping Operations-DPKO)

६. मानवीय कार्य समन्वय कार्यालय (Office of Coordinating Human Activity-OCHA)

७. आर्थिक आणि सामाजिक कार्य विभाग (Department of Economic and Social Activities - DESA)

८. महासभा कार्य आणि संमेलन सेवा विभाग (Department of General Assembly Activity and Conference Services - DGAACS)

९. लोकसूचना विभाग (Department of Public Information - DPI)

१०. प्रबंधक विभाग (Department of Management- DM)

११. संयुक्त राष्ट्र सुरक्षा समन्वय कार्यालय (Office of Llmited Nations Security Coordinator)

अशा या विविध विभागांच्या प्रमुख पदी उपमहासचिव असतात आणि त्यांची स्वतंत्र कार्यालय यंत्रणा असते.

युनोचा अन्य मुख्य परिवार संयुक्त राष्ट्रसंघाचे कार्य विविध क्षेत्रांत फार मोठ्या प्रमाणात चालते. हे कार्य करण्यासाठी स्वतंत्र असे विशिष्ट कार्यासाठीचे उपविभाग कार्यरत आहेत. त्यातील काही प्रमुख विभाग पुढीलप्रमाणे आहेत.

### युनोचे प्रमुख उपविभाग

| क्र. | संघटन | स्थापना वर्ष | मुख्यालय | प्रमुख कार्य |
|---|---|---|---|---|
| १. | आंतरराष्ट्रीय परमाणु ऊर्जा अभिकरण (IAEA) | २९ जुलै १९५७ | व्हिएन्ना (ऑस्ट्रिया) | परमाणु ऊर्जेचा शांततेसाठी उपयोग करण्यासाठी प्रोत्साहन देणे. |
| २. | विश्व स्वास्थ्य संगठन (WHO) | ७ एप्रिल १९४८ | जिनिव्हा (स्वित्झरलँड) | जगातील सर्व लोकांच्या आरोग्यासाठी कार्य करणे. |
| ३. | आंतरराष्ट्रीय श्रम संगठन (ILO) | ११ एप्रिल १९१९ | जिनेवा (स्विर्त्झलँड) | जगातील श्रमिकांच्या स्थितीमधील सुधारणा करणे. १९६९ मध्ये या संघटनेला नोबेल शांती पुरस्कार मिळाला. |
| ४. | संयुक्त राष्ट्र खाद्य एवं कृषी संगठन (FAO) | १६ ऑक्टोबर १९४५ | रोम (इटली) | जगातील कृषी आणि आहार-पोषण स्तर सुधारणे आणि जीवनमान उंचावणे. |
| ५. | आंतरराष्ट्रीय मुद्रा कोष (IMF) | २७ डिसेंबर १९४५ | वॉशिंग्टन (अमेरिका) | जगातील सदस्य देशांचे विनिमय व्यवहार आणि व्यापार व्यवहार सुधारणे. आर्थिक विकासासाठी मदत करणे. |
| ६. | युनेस्को (UNESCO) | ४ नोव्हेंबर १९४६ | पॅरिस (फ्रान्स) | विश्वशांतीसाठी शिक्षण, विज्ञान आणि संस्कृती संवर्धनासाठी कार्य करणे. |
| ७. | सार्वभौम डाक संघ (UPU) | ९ ऑक्टोबर १९७४ ला सामान्य डाक अभिसमयपर हस्ताक्षर १९४८ मध्ये संयुक्त राष्ट्र अभिकरण झाले. | बर्न (स्वित्झरलँड) | जगातील लोकांमध्ये संबंध वाढविण्यासाठी डाक सेवेद्वारा सहकार्य करणे. |
| ८. | विश्व बँक (World Bank) | १९४५ | वॉशिंग्टन (अमेरिका) | उत्पादन आणि विकासासाठी भांडवल पुरवठा करणे. |
| ९. | आंतरराष्ट्रीय दूर-संचार संघ (ITU) | १८६५ | जिनिव्हा (स्विर्त्झरलँड) | जागतिक दळणवळणाच्या क्षेत्रात सहकार्य करणे. |
| १०. | आंतरराष्ट्रीय नागरिक उद्यान संगठन (ICAO) | ७ डिसेंबर १९४४ | मॉंट्रियल (कॅनडा) | आंतरराष्ट्रीय क्षेत्रात नागरिकांना सर्व प्रकारच्या प्रवासासाठी मदत करणे. |
| ११. | विश्व मौसम विज्ञान संगटन (WMO) | १९५१ | जिनिव्हा (स्वित्झरलँड) | जगातील हवामानाचा अभ्यास करून सर्व देशांना माहिती देणे. आपत्तीसंबंधी सूचना देणे, त्यातील शोध लावणे. |
| १२. | आंतरराष्ट्रीय सामुद्रिक संगठन (IMO) | १७ मार्च १९५८ | लंडन (ब्रिटन) | समुद्रातील मालवाहतूक व नागरिकांची वाहतूक सुरक्षित करणे. |
| १३. | संयुक्त राष्ट्र औद्योगिक विकास संगठन (UNIDO) | नोव्हेंबर १९६६ | व्हिएन्ना (ऑस्ट्रिया) | औद्योगिकीकरणासाठी तांत्रिक, आर्थिक व व्यापारविषयक सहकार्य करणे. |
| १४. | विश्व बौद्धिक संपदा संगठन (WIPO) | १९६७ | जिनिव्हा (स्वित्झरलँड) | जगातील बौद्धिक संपदा-कॉपीराइट यांचा सन्मान व संरक्षण करणे. |

| क्र. | संघटन | स्थापना वर्ष | मुख्यालय | प्रमुख कार्य |
|---|---|---|---|---|
| १५. | विश्व व्यापार संगठन (WTO) | १ जानेवारी १९९५ | जिनिव्हा (स्वित्झर्लंड) | आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील योग्य व्यापार प्रणाली विकसित करणे. |
| १६. | आंतरराष्ट्रीय कृषि विकास कोष (IFAD) | १३ जून १९७६ | रोम (इटली) | खाद्य उत्पादन आणि पोषण-आहार यासाठी सर्व देशांना मदत करणे. |
| १७. | विश्व पर्यटन संगठन (WTO) | १९२५ | माद्रिद (स्पेन) | पर्यटनाद्वारे जगातील सर्व देशांत चांगले संबंध निर्माण करणे, ऐतिहासिक वास्तु आदींचे जनत करणे, पर्यावरणाचे रक्षण करणे. |
| १८. | रासायनिक हत्यार निषेध संगठन (OPCW) | २९ एप्रिल १९९७ | हेग (नेदरलँड) | जगात शांतता निर्माण करण्यासाठी रासायनिक शस्त्रांवर नियंत्रण ठेवणे, प्रयोग थांबविणे. |
| १९. | व्यापक परमाणु परीक्षण प्रतिबंध संधि संगठन | १९ नोव्हेंबर १९९६ | व्हिएन्ना (ऑस्ट्रिया) | सी. टी. बी. टी. कराराद्वारे जगात शांतता निर्माण करणे. |

अशा प्रकारे या विविध शाखांच्या द्वारे युनोचे कार्य अतिशय प्रभावीपणे चालते. या संघटनांप्रमाणेच इतर जागतिक आणि प्रादेशिक स्तरावर कार्य करणाऱ्या अनेक संघटना कार्य करतात. (अशा संघटनांची माहिती प्रकरण १० मध्ये 'आंतरराष्ट्रीय सत्ता व जागतिक व्यवस्था' यामध्ये सविस्तर दिलेली आहे.) या सर्व संघटनांचा मूलभूत आणि प्रमुख असा उद्देश जगातील मानवाला शांतता, सहकार्य आणि विकास साध्य करणारे जग निर्माण करण्यासाठी कार्य करणे हा आहे, असेच दिसून येते.

सारांशाने युनोच्या सचिवालयाचे कार्य हे जगामध्ये सतत कोठे ना कोठे आंतरराष्ट्रीय परिषदा होत असतातच, अनेक जागतिक घडामोडी सतत घडतात. त्या सर्वांची नोंद घेणे आणि ती माहिती सुरक्षा समिती व महासभेला सादर करणे हे फार जिकिरीचे आणि महत्त्वाचे कार्य सचिवालयातर्फे केले जाते. म्हणूनच युनोचे यशापयश नि:पक्ष, शिस्तप्रिय



पदाधिकाऱ्यांवर अवलंबून आहे असेच म्हणता येते.

## ● संयुक्त राष्ट्र संघाच्या कार्याचे मूल्यमापन ●

पहिल्या महायुद्धानंतर जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी 'लीग ऑफ नेशन्स' ही आंतरराष्ट्रीय संघटना निर्माण झाली. परंतु संघटनेतील अंतर्गत मतभेद, आर्थिक टंचाई, अमेरिकेसारखे मोठे राष्ट्र तिचे सभासद नसणे, पराभूत राष्ट्रांवर लादलेली जाचक बंधने, जर्मनीमधील हिटलरचा उदय, विजेत्या राष्ट्रांनी मँडेट पद्धतीचा केलेला दुरुपयोग इत्यादी अनेक कारणांनी ही संघटना १९३९ मध्ये नष्ट झाली व महायुद्ध सुरू झाले.

दुसऱ्या महायुद्धाचे ढग १९३५ पासूनच जमू लागले होते. फ्रान्स, इंग्लंड, रशिया, अमेरिका ह्यांच्याविरुद्ध जर्मनी आणि जपान ही राष्ट्रे लढली. मित्रराष्ट्रांचा विजय झाला. ह्या युद्धामध्ये लक्षावधी लोक प्राणास मुकले. लक्षावधी लोक कायमचे अपंग झाले व लक्षावधी लोकांचा तर ठावठिकाणाच लागला नाही. कोट्यवधी रुपयांची संपत्ती (घरेदारे, शेती, कारखाने, पूल, लायब्ररीज वगैरे) पूर्णपणे नष्ट झाली. अमेरिकेने अणुबाँबसारख्या संहारक शक्तीचा उपयोग हिरोशिमा आणि नागासाकी शहरांवर करून लक्षावधी माणसांचा काही तासांच्या अवधीमध्ये (१९४३-४४) संहार केला. परिणामत: जर्मनी-जपानचा पराभव झाला व दुसरे महायुद्ध थांबले.

पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धाने जगातील संपूर्ण मानवजातीला अपरिमित अशा दु:खाच्या खाईत लोटले. आता पुन्हा युद्धाचा प्रसंग निर्माण होऊ नये या एकाच हेतूने संयुक्त राष्ट्रसंघाची निर्मिती २४-१-१९४५ रोजी झाली. राष्ट्राराष्ट्रातील संघर्षाचे प्रश्न युद्धाद्वारे सोडवू नयेत, कारण युद्धाने ते कायमचे सुटत नाहीत, हे सर्वच राष्ट्रांना पटले. जगात शांतता नांदावी, संघर्षाचे प्रश्न शांततेच्या मार्गाने सुटावेत, स्वातंत्र्याच्या व्यापक भूमिकेतून परस्परांशी सहकार्य करावे, संपूर्ण मानवजातीचा आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक विकास व्हावा ह्या उदात्त हेतूनेच ही राष्ट्रसंघटना स्थापन झाली.

**यश** – सुरुवातीला काही वर्षात ह्या राष्ट्रसंघटनेने जागतिक संघर्षाचे प्रश्न चांगल्या तऱ्हेने हाताळले आणि युद्धाचे सावट दूर केले. उदाहरणार्थ —

१. **इराण** – रशियाचे सैन्य इराणमध्ये पसरले होते. त्यामुळे इराणच्या शांततेला धोका निर्माण झाला होता. परंतु १९४६ साली इराणमधून संपूर्ण सैन्य बाहेर काढून घेण्यास युनोने रशियास भाग पाडले.

२. **सीरिया – लेबेनॉन** – इंग्रज आणि फ्रेंच यांचे सैन्य सीरिया - लेबेनॉनमध्ये होते. त्यामुळे त्यांच्या शांततेला धोका निर्माण झाला होता. ते सैन्यदेखील युनोच्या प्रयत्नानेच निघाले.

३. **ग्रीस** - कम्युनिस्टांचा पाठिंबा असलेले गनिमी सैनिक १९४५ ते ४८ या काळात ग्रीसमध्ये चोरटे हल्ले करीत होते. महासभेने जागतिक मत जागृत करून ह्या गनिमांना हुसकावून लावले व ग्रीसला स्वातंत्र्य मिळाले.

४. **पॅलेस्टाईन** - इस्त्रायल व अरब देश यांच्यात १९४७मध्ये शस्त्रसंधी घडवून आणली. १९४७ साली ज्यू लोकांचा इस्त्रायल हा स्वतंत्र देश निर्माण झाला.

५. **कोरिया** - कम्युनिस्टांच्या प्रोत्साहनाने उत्तर कोरियाने १९५० साली दक्षिण कोरियावर आक्रमण केले. युनोने ५३ राष्ट्रांच्या सहकार्याने सैनिक कारवाई करून हा प्रश्न सोडविला.

६. **सुवेझ कॅनॉल** - सुवेझ कॅनॉलवर ब्रिटिशांचे आणि फ्रेंचांचे वर्चस्व होते. इजिप्तने १९५० साली ते नष्ट करण्याचे आवाहन केले. त्याने सुवेझ कॅनॉलचे राष्ट्रीयीकरण केले. तेव्हा निर्माण झालेला पेचप्रसंग युनोने यशस्वीरीत्या सोडविला.

७. **आखाती युद्ध आणि दहशतवाद** - इ. स. १९९०-९१ आणि २००१ ते ४ या काळातील इराकच्या सद्दाम हुसेनमुळे आणि अफगाणिस्तानमधील व इतर भागातील दहशतवादी कारवाया थांबविण्यासाठी विशेषत: क्रूर दहशतवादी लादेनचा सफाया करण्यासाठी अमेरिका-ब्रिटनच्या पुढाकाराने युनोमार्फत सामहिक लष्करी कारवाई करण्यात आली. त्यात चांगले यश मिळाले. सद्दामचा सफाया झाला. पण लादेन अजून सापडलेला नाही. सप्टेंबर २००१ ची अमेरिकेतील दहशतवादी घटना आणि वाढता दहशतवाद हीच आज युनोपुढील मोठे आव्हान आहे. त्याचप्रमाणे अँग्लो-इराणियन तेल संघर्ष, अँग्लो-नॉर्वेजियन मासेमारी संघर्ष, बर्लिन तटबंदी, ट्युनिशिया, मोरक्को, युगोस्लाव्हिया, स्पॅनिश प्रश्न, मलाया, कांगो, झेकोस्लोव्हाकिया, ऑस्ट्रिया इत्यादी ठिकाणचे युद्धाचे प्रश्न युनोने चांगल्या रीतीने सोडविले. अलीकडेच इराण-इराक ह्यांनी आपसांतील संघर्ष थांबवावा असा ठराव सुरक्षा समितीने एकमताने पास केला.

युनोच्या इतर संघटनांनीदेखील आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्यविषयक इत्यादी क्षेत्रामध्ये महत्त्वपूर्ण कामगिरी केली. शांतता आणि सुरक्षितता नांदण्यासाठी वरील प्रश्नांची सोडवणूक होणे किती आवश्यक होते हे त्यामुळे सिद्ध झाले. युनोने १५ देशांना तंत्रज्ञ पुरविले, १२० देशांतील २५,००० हून अधिक उमेदवारांना तांत्रिक शिक्षण दिले, १२० देशांतील लक्षावधी बालकांना आणि गरोदर स्त्रियांना मदत केली आणि अजूनही करीत आहे. युनोने आतापर्यंत २५ लाखांहून जास्त निराश्रित आणि निर्वासितांचे पुनर्वसन केले. मानवी हक्क आणि मानवी स्वातंत्र्याचा जाहीरनामा प्रसिद्ध करून मानवाच्या मूलभूत हक्कांना मान्यता दिली.



युनोला संलग्न असलेल्या १९ संस्थांमार्फत सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक, तांत्रिक इत्यादी क्षेत्रांमध्ये मानवजातीच्या कल्याणाचे कार्य अविरत चालू आहे.

ह्या सर्व उदाहरणांवरून युनो ही आपल्या नियोजित कार्यामध्ये यशस्वी आहे असे म्हणणे योग्य होईल.

**अपयश** - खालील गोष्टींचा विचार करता दुर्दैवाने म्हणावे लागते की, युनोचे वर नमूद केलेले यश मान्य करूनही, ती आपल्या नियोजित कार्यात पूर्ण यश संपादन करू शकलेली नाही.

**उदा** - १. व्हिएटनाममध्ये सुरू असलेला संघर्ष आणि होत असलेली मानवी हत्या आणि संपत्तीची नासधूस व जाळपोळ अजूनही युनो थांबवू शकली नाही. २. काश्मीरवरील भारताच्या हक्कास युनोने अजूनही मान्यता दिली नाही. ३. १९४८, ६२, ६५ आणि १९७१ साली पाकिस्तानने भारतावर जाणूनबुजून आक्रमणे करून युद्ध केले. अजूनही त्याची आक्रमणे होतच आहेत. तरी पण पाकिस्तानला आक्रमक म्हणून युनोने घोषित केले नाही व त्याच्या आक्रमक वृत्तीला पायबंद घातला नाही. ४. १९७१ साली पाकिस्तानने बांगला देशात जे अमानुष अत्याचार केले त्याबद्दल त्याला जाब विचारला नाही किंवा दोषही दिला नाही. ५. अमेरिकेने १९७१ साली पाकिस्तानला मदत करण्यासाठी व भारताला शह देण्यासाठी हिंदी महासागरात सातवे आरमार आणून उभे केले होते. आजही अमेरिका पाकिस्तानला सतत लष्करी साहित्याचा पुरवठा करीतच आहे. त्यामुळे या उपखंडात आजही तंग वातावरण आहे. त्याबद्दल यूनो अमेरिकेला जाब विचारीत नाही. ६. व्हिएटनाममधील बाँब हल्ल्यांबाबत युनो अमेरिकेला दोष देत नाही व तेथून सैन्य काढून घेण्यास तिला भाग पाडत नाही. ७. आजही जगात शस्त्रास्त्रांची स्पर्धा सुरूच आहे. नि:शस्त्रीकरण हे केवळ पोकळ आश्वासन ठरले आहे. इत्यादी अनेक प्रश्नांची यशस्वी रीतीने सोडवणूक करण्यास युनो असमर्थ ठरली आहे. कारण शस्त्रास्त्रांचा पुरवठा मोठी राष्ट्रे करीत आहेत.

ह्याचाच अर्थ असा आहे की, युनोच्या कार्यपद्धतीमध्ये काही दोष निर्माण झाले आहेत व त्यामुळेच वरील प्रश्न ती सोडवू शकत नाही. हे दोष कोणते याचा विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

### ● युनोच्या अपयशाची कारणे ●

१. **व्हेटो आणि पाच मोठी स्थायी राष्ट्रे :-** सुरक्षा समितीमध्ये इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, रशिया आणि कम्युनिस्ट चीन ह्यांना स्थायी सभासदत्व आहे. जागतिक

महत्त्वाचे प्रश्न सोडविण्याची जबाबदारी सुरक्षा समितीवरच आहे. स्वत:चे हितरक्षण करण्यासाठी ह्या स्थायी राष्ट्रांना नकाराधिकार प्राप्त झाला आहे. कोणत्याही प्रश्नाचा निकाल लावण्यासाठी ह्या पाचही स्थायी राष्ट्रांचे एकमत आवश्यक असते.

साहजिकच सुरक्षा समितीत महत्त्वाच्या प्रश्नांबाबत मतभेद होतात. तेथे भांडवलवादी आणि साम्यवादी असे दोन गट निर्माण झाले आहेत. त्यामुळे सुरक्षा आणि जागतिकदृष्ट्या महत्त्वाचे प्रश्न सोडविण्यास युनो असमर्थ ठरली आहे. भारत तैवान चीनऐवजी कम्युनिस्ट चीनला सभासदत्व द्यावे असा ठराव १९६५ पासून मांडत आहे. परंतु केवळ स्वार्थाने तो ठराव प्रत्येक वेळेस नकाराधिकार वापरून अमेरिकेने फेटाळला. १९७१ साली अमेरिकेचे राजदूत डॉ. किसिंजर ह्यांनी पेकिंगला भेट दिली. दोन्ही देशांनी पिंगपाँग पॉलिसी मान्य केली. परिणामत: कम्युनिस्ट चीनला युनोचे आणि सुरक्षा समितीचे स्थायी सभासदत्व प्राप्त झाले व तैवान चीनची हकालपट्टी झाली. भारताने म्हटले आहे तेच घडले, पण त्याचे श्रेय अमेरिकेने स्वार्थी वृत्तीने स्वत:कडे घेतले.

तसेच भारत सरकारने डिसेंबर १९७१ मध्ये स्वसंरक्षणार्थ पाकिस्तानच्या विरुद्ध लष्करी कारवाई केली आणि पाकिस्तानी आक्रमकांना भारताच्या भूमीवरून पिटाळून लावले. भारत पाकिस्तानचा पूर्ण बिमोड करण्यास समर्थ होता तरी पण त्याने एकतर्फी युद्धबंदी केली. कारण त्याला दुसऱ्याच्या भूमीचे अपहरण करायचे नव्हतेच. परंतु अमेरिकेने स्वत:च्या स्वार्थी धोरणामुळे भारत सरकारला दोषी ठरविण्याचा ठराव सुरक्षा समितीत मांडला. कम्युनिस्ट चीनने वैरभावाने त्या ठरावास दुजोरा दिला. इंग्लंड आणि फ्रान्स ही राष्ट्रे गप्प राहिली. शेवटी रशियाला व्हेटो वापरावा लागला वं अमेरिकेचा ठराव बारगळला.

ह्या सर्व उदाहरणांवरून असा निष्कर्ष निघतो की, सुरक्षा समितीतील स्थायी राष्ट्रांचे हितसंबंध एखाद्या प्रश्नांशी निगडीत असतील तर सुरक्षा समिती तो प्रश्न सोडविण्यास असमर्थ ठरते. कारण ह्या स्थायी बड्या राष्ट्रांनी व्हेटो कसा आणि किती वेळा वापरावा यावर बंधन नाही. स्वार्थासाठी व्हेटोचा दुरुपयोग होतो. त्यामुळेच सुरक्षा समिती ही युनोची केवळ नाममात्र कार्यकारिणी ठरली आहे. नकाराधिकाराच्या भीतीमुळेच कोणतेही राष्ट्र सुरक्षा समितीकडे प्रश्न सोपविण्यास धजत नाही. या नकाराधिकारामुळेच युनोच्या प्रगतीत अडथळा निर्माण होत आहे.

२. **खासगी कामकाज :-** घटना कलम ७ अनुसार संयुक्त राष्ट्रसंघ कोणत्याही राष्ट्राच्या खासगी कामात हस्तक्षेप करू शकत नाही. परंतु खासगी प्रश्न कोणता हे ठरविण्याचा काही नियम नाही. भारत सरकारने पाकिस्तानच्या बांगला देशातील अमानुष



हत्याकांडाबद्दल केलेल्या कारवाईला अमेरिका दोष देते, परंतु तीच अमेरिका व्हिएटनाममध्ये वर्षानुवर्षे बाँब हल्ले करीत होती. तेव्हा परराष्ट्रावर बाँब हल्ले करणे हा अमेरिकेचा खासगी प्रश्न ठरतो, पण इतर राष्ट्रांचे खासगी प्रश्न मात्र तिच्या दृष्टीने जागतिक प्रश्न ठरतात !

ह्या कारणांमुळे सुरक्षा समितीमध्ये महत्त्वाच्या प्रश्नांवर एकमत होऊच शकत नाही. काश्मीर प्रकरणी पाकिस्तान आक्रमक असूनही सुरक्षा समिती पाकिस्तानला दोष देत नाही. लाल चीनने तिबेट गिळंकृत केला, दक्षिण आफ्रिका वर्णद्वेषी धोरणाचा अजूनही पाठपुरावा करते व मानवी हक्कांची सनद धुडकावून लावते, परंतु त्याविरुद्ध युनो आणि सुरक्षा समिती ब्र काढीत नाही.

३. **सभासदत्व :-** जगातील सर्व शांतताप्रिय राष्ट्रांना युनोचे सभासदत्व द्यावे असे युनोच्या सनदेत कलम ७ मध्ये म्हटले आहे. परंतु शांतताप्रिय राष्ट्र कोणाला म्हणावे हे स्पष्ट केलेले नाही. लाल चीनला डिसेंबर १९७१ पर्यंत आक्रमक राष्ट्र म्हणून अमेरिकेने मान्यता दिली नाही. परंतु पिंगपाँग पॉलिसीमुळे लागलीच त्याला युनोचे सभासदत्व मिळाले. दुसऱ्या महायुद्धात मित्रराष्ट्रांविरुद्ध लढणाऱ्या राष्ट्रांपैकी जपान आणि इटली ह्या राष्ट्रांना युनोचे सभासदत्व मिळाले. परंतु कोरिया आणि जर्मनी यांना मात्र बरीच वर्षे वंचित ठेवले. एकंदरीत युनोचे सभासदत्व प्राप्त होण्याच्या मार्गात नकाराधिकार असलेली ही पाच बडी राष्ट्रेच स्वार्थासाठी अडथळा आणतात.

४. **आवश्यक बहुमत** - जगामध्ये शांतता प्रस्थापित करण्याची जबाबदारी सुरक्षा समितीवर आहे. सुरक्षा समितीच्या १५ सदस्यांपैकी ९ सदस्यांचे मत हे बहुमत ठरते. परंतु येथे तसे नाही, तर ९ मध्ये ५ स्थायी राष्ट्रे असलीच पाहिजेत असे आहे. बहुमताचा आदर करताना स्थायी राष्ट्रांना नकाराधिकार देणे व खरे बहुमत डावलणे हे लोकशाहीशी विसंगत आहे. पाच बडी राष्ट्रे म्हणतील तेच खरे बहुमत असे समीकरण झाले आहे. त्यामुळे जागतिक प्रश्न-तो कितीही महत्त्वाचा असता तरी अमेरिका, रशिया इत्यादी स्थायी राष्ट्रांशी संबंधित असेल तर सुटूच शकत नाही. उदा. नि:शस्त्रीकरण, व्हिएटनाममधील बाँब हल्ले, इस्त्रायलवरील आक्रमणे इत्यादींचा विचार करावा म्हणजे स्पष्ट होईल.

५. **आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे निर्णय** - राष्ट्राराष्ट्रांनी परस्परांतील संघर्षाचे प्रश्न आंतरराष्ट्रीय न्यायालयाद्वारे सोडवावेत ही गोष्ट तत्त्वत: योग्य आहे, परंतु जोपर्यंत वादी-प्रतिवादी राष्ट्रे मानीत नाहीत तोपर्यंत तो न्याय नाममात्र ठरतो. तो त्यांच्यावर बंधनकारक

नसतो. ह्याचा अर्थ असा की, आंतरराष्ट्रीय न्यायालय हे संघर्षाच्या प्रश्नांची केवळ चर्चा करणारेच न्यायालय आहे. मग ते योग्य निर्णय देऊन शांतता कशी प्रस्थापित करू शकेल ?

६. **विभागीय करार :-** संविधान कलम ५२ (१) नुसार कोणतीही सभासद राष्ट्रे आपापसात करार करून प्रादेशिक संरक्षण करार करू शकतात. त्यासाठी दोन किंवा अधिक राष्ट्रे एकत्रित येऊन विभागीय सुरक्षा मंडळ निर्माण करू शकतात आणि आपल्या स्वातंत्र्याचे संरक्षण करू शकतात. ही सुरक्षा मंडळे युनोच्या अंतर्गत निर्माण होत असली तरी ती सत्तागटापासून (Power Block) अलग राहू शकत नाहीत हे आजवर स्पष्ट झाले आहे. ब्रुसेल्स करार, सीटो (SEATO), नाटो (NATO), सेन्टो (CENTO) ही अमेरिकाप्रणीत सुरक्षा मंडळे होत. ह्या मंडळांत अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया, न्युझीलंड, कॅनडा, नायजेरिया, झांबिया, ग्वायना, मॉरिशस इत्यादी वेगवेगळ्या खंडांतील अनेक राष्ट्रे संम्मीलित आहेत. बगदाद पॅक्ट, वॉर्सा पॅक्ट ही रशियाप्रणीत सुरक्षा मंडळे तशीच आहेत. त्याशिवाय अरब लीग, राष्ट्रकुटुंब, ऑस्ट्रेलिया, पॅसिफिक करार असे अनेक करार आहेत.

एकूण ह्या विभागीय सुरक्षा मंडळातील राष्ट्रे परस्परांना लष्करी मदत करतात. सदस्य राष्ट्रांवरील आक्रमण परतवून लावण्यास ती कराराने बांधलेली असतात. साहजिकच त्यांचे नेतृत्व ज्या अमेरिका, रशिया वगैरे राष्ट्रांकडे आहे ते परस्परांना शह आणि काटशह देतात. ह्यांच्याविरुद्ध सुरक्षा समिती आणि महासभा कोणतीच कारवाई करू शकत नाही.

७. **विश्वस्त समिती :-** अप्रगत राष्ट्रांचा विकास करण्यासाठी व त्यांना स्वातंत्र्य प्राप्त करून देण्यासाठी ही समिती निर्माण झाली आहे. अप्रगत राष्ट्रांचा सर्वच दृष्टीने विकास करण्याची जबाबदारी एखाद्या प्रगत राष्ट्राकडे सोपविण्यात येते. परंतु प्रगत राष्ट्राने त्या प्रदेशाचा विकास किती अवधीत करावा, त्याला केव्हा स्वातंत्र्य द्यावे ह्यासंबंधी काहीच बंधन नाही. आपल्या आधीन असलेल्या प्रदेशांना स्वातंत्र्य देण्यास अशी प्रगत राष्ट्रे बहुधा नाखूष असतात ही सत्य गोष्ट आहे ! मग विश्वस्त समिती केवळ देखावा ठरतो.

८. **इतर कारणे :-** I) संयुक्त राष्ट्रसंघटनेने मानवी अधिकाराची घोषणा केली आहे व त्याचे संरक्षण करण्याचे निःसंदिग्ध आश्वासन सर्व राष्ट्रांना दिले आहे. परंतु आजही दक्षिण आफ्रिका वर्णद्वेषी धोरण अंगीकारते. अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि



इंग्लंडमध्ये आजही काही भागात वंशभेद दिसतोच. परंतु त्याबाबतीत संयुक्त राष्ट्र संघटना असमर्थ ठरत आहे.

II) महासभेने दिलेले आश्वासन आजही सभासद राष्ट्रे तोडतात. महासभेच्या मताविरुद्ध रशियाने हंगेरीमध्ये हस्तक्षेप केला. हंगेरी हे संयुक्त राष्ट्र संघटनेचे सदस्य असूनही त्याने संयुक्त राष्ट्र संघटनेच्या शांतता निरीक्षण पथकाला प्रवेश दिला नाही.

III) निःशस्त्रीकरण सर्वच राष्ट्रांनी करावे असा पोकळ ठराव नेहमी संमत होतो. प्रत्यक्षामध्ये आजही अण्वस्त्रांचे प्रयोग सुरूच आहेत. वास्तविक पाहता हे मानवी आरोग्याला विघातक आहेत. ह्या अण्वस्त्र प्रयोगांवर बंदी घालण्यास युनो असमर्थ ठरली आहे.

**समारोप :-** अशा रीतीने युनोमध्ये आज अनेक दोष निर्माण झाले आहेत. सभासद राष्ट्रांनी सभासदत्व सोडू नये असे बंधन असतानाही पोर्तुगाल, मलेशिया, ग्रीस ह्या देशांनी सभासदत्व सोडले. सभासदाला हाकलून देण्याची अगर त्याचे सभासदत्व रद्द करण्याची प्रथा अगर नियम नसतानाही तैवान चीनची संयुक्त राष्ट्रसंघटनेतून हकालपट्टी झालीच. दुसऱ्या महायुद्धानंतर जेरुसलेम, कोरिया, बर्लिन, ग्रीस, व्हिएतनाम, भारत-पाकिस्तान येथे युद्धजन्य परिस्थिती उद्भवलीच.

हे खरे की, त्यातील काही युद्धांना संयुक्त राष्ट्र संघटनेने पायबंद घातला. उदा. जेरुसलेम, कोरिया, इंडोनेशिया, ग्रीस, पॅलेस्टाईन ह्या देशातील युद्धे युनोने थांबविली. कोरिया, कांगो, कटांगा इत्यादी देशांत युनोने स्वतःचे सैन्य पाठवून शांतता प्रस्थापित केली. सीरिया-लेबेनॉन, इराण-सुवेझ कॅनॉल असे महत्त्वाचे संघर्ष युनोने यशस्वीरीत्या सोडविले. यावरून असे म्हणता येईल की, युनो काही प्रमाणात जागतिक युद्धे आणि युद्धजन्य परिस्थिती नष्ट करण्यात यशस्वी ठरली आहे.

१९५५ साली जिनिव्हा येथे ७२ राष्ट्रांची एक निःशस्त्रीकरण परिषद भरली. शस्त्रास्त्रांचा उपयोग मानवी संहारासाठी होऊ नये असे तत्त्व मान्य केले. परंतु आज शस्त्रास्त्रांचा उपयोग संहारासाठी होतच आहे. ही शस्त्रास्त्र स्पर्धा आता अंतराळात होऊ लागली आहे. निरनिराळे उपग्रह अंतराळात सोडून परस्पर राष्ट्रांतील महत्त्वाच्या ठिकाणांची छायाचित्रे घेण्याचे प्रयत्न आजही सुरू आहेत.

असे असले तरी गेल्या २५ वर्षांमध्ये युनोने ८ कोटींहून जास्त लोकांना राजकीय स्वातंत्र्य मिळवून दिले. युनोची पूर्वीची ५१ सभासद संख्या आज १९१ झाली आहे. आंतरराष्ट्रीय मजूर संघटना, आंतरराष्ट्रीय आरोग्य संघटना, युनेस्को इत्यादी संघटना आजही मानवतावादी प्रश्न सोडविण्याचे कार्य आपापल्या परीने करीत आहेत.

२४ ऑक्टोबर १९५७ ह्या दिवशी भाषण करताना पंडित नेहरू म्हणाले, "गेल्या

बारा वर्षांत जर युनो नसती तर एखादे जागतिक युद्ध निश्चितच झाले असते. युनोच्या अस्तित्वामुळेच हा प्रलयकाळ टळला.''

युनोविषयी प्रेसिडेंट **आयसेनहॉवर** म्हणाले, ''युनोचे सर्व दोष, आजपर्यंतची सर्व अपयशे लक्षात घेऊनही मी असेच म्हणतो की, युनो हे मानवतेचे संघटित आणि सर्वश्रेष्ठ असे आशास्थान आहे.'' युनोने सर्व सभासद राष्ट्रांना रणांगणाऐवजी चर्चेचे व्यासपीठ प्राप्त करून दिले आहे. सध्याच्या जागतिक तंग वातावरणामध्ये युनो नसती तर तिसरे महायुद्ध होऊन सर्व विनाशक अस्त्रांच्या उपयोगामुळे जगाचा विनाश झाला असता.

**ट्रीग्वेली** (युनोचे पहिले सेक्रेटरी जनरल) म्हणाले की, ''शांतता आणि प्रगती ह्या ध्येयासाठी सर्व राष्ट्रांना भेदाभेद न करता येणारा एकमेव मार्ग म्हणजे युनोच आहे. सर्व राष्ट्रांनी युनोवर आपली श्रद्धा ठेवून कार्य केले व सामंजस्य दाखविले तर जगात निश्चितच शांतता नांदेल व मानवजातीचे कल्याण होईल.''

युनोविषयी बोलताना **श्रीमती विजयालक्ष्मी पंडित** म्हणतात, ''आंतरराष्ट्रीय वाद मिटविणे हे युनोचे कार्य नाही तर मानवाचे हित साधण्यासाठी मानवतेला सहकार्याच्या नवयुगाकडे नेणे हेच युनोचे कार्य आहे. आजच्या परिस्थितीमध्ये जगातील १३२ राष्ट्रांना एकत्र आणणारी तीच एकमेव संस्था आहे.''

**वॉल्टर लिपमन** म्हणतो, ''राजकीय मतभेद आणि वैमनस्य असूनही जागतिक प्रश्नांबाबत सहकार्याची भावना वाढीस लावणारी युनो हीच एकमेव संस्था आहे.''

सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ **आल्बर्ट आइनस्टिन** म्हणतो, ''आर्थिक बाबतीत जरी युनाने थोडेसेच यश संपादन केले असले तरी मानवी क्षेत्रामध्ये राजकीय तंग वातावरण कमी करून युनो ही निश्चितच जगाच्या उपयोगी ठरली आहे.''

सभासद राष्ट्रांनी युनोचा उपयोग निष्ठेने, सातत्यपूर्वक आणि समंजसपणे करून घेतला तर जगात शांतता प्रस्थापित होऊन संपूर्ण मानवजातीचे कल्याण होईल हे निश्चित.

**उपाययोजना :-** युनो निर्दोष व्हावी, जगातील लोकांच्या अपेक्षा तिच्या द्वारे पूर्ण व्हाव्यात ह्यासाठी पुढील उपाय अंमलात आणणे आवश्यक आहे.

१. स्थायी राष्ट्रांचा नकाराधिकार नष्ट करावा. महत्त्वाचे निर्णय उपस्थिती आणि मतदान करणाऱ्या राष्ट्रांच्या दोन तृतीयांश बहुमताने घ्यावेत.

२. सुरक्षा समितीची पुनर्रचना करावी. आशिया आणि आफ्रिका खंडातील नवीन स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांना त्या समितीत योग्य प्रतिनिधित्व द्यावे. भारतासारख्या जगातील सर्वांत मोठ्या लोकशाही आणि शांतताप्रिय राष्ट्राला सुरक्षा समितीमध्ये कायम स्थान द्यावे.



३. प्रादेशिक संरक्षण करार नष्ट करावेत. अणुशक्तीचे उत्पादन आणि संशोधन मानवी कल्याणासाठी होईल, संहारासाठी होणार नाही, ह्याची दक्षता बाळगावी.

४. स्वसंरक्षण आणि खासगी अधिकारक्षेत्र ह्यांची स्पष्ट व्याख्या करावी. म्हणजे युनो ही राष्ट्रांच्या महत्त्वपूर्ण कार्यांमध्ये हस्तक्षेप करू शकेल. उदा. दक्षिण आफ्रिकेच्या वर्णविद्वेषी धोरणात युनो हस्तक्षेप करू शकेल.

५. वसाहतवाद आणि साम्राज्यवाद जगातून नष्ट करावा. विश्वस्ताधीन राष्ट्रांना विशिष्ट अवधीत स्वातंत्र्य देण्याची व्यवस्था करावी.

६. आंतरराष्ट्रीय सुरक्षा दल निर्माण करावे. राष्ट्रांच्या सैन्यात कपात करावी आणि आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करण्यासाठी वेळप्रसंगी ह्याच सुरक्षा दलाचा उपयोग युनोने सर्वसंमतीने करावा.

७. युनोच्या तत्त्वांना हरताळ फासणाऱ्या राष्ट्रांविरुद्ध युनोच्या सदस्यांनी प्रत्येक क्षेत्रात परिणामकारक बहिष्कार टाकावा.

८. महासभेला सर्व राष्ट्रांसाठी कायदे करण्याचा अधिकार द्यावा.

९. सध्याची निर्माण झालेली युनोतील गटबाजी नष्ट करावी. गटांचे राजकारण आणि स्वार्थ नष्ट झाल्यास लहान राष्ट्रांची खऱ्या अर्थाने प्रगती होईल.

१०. अणुशक्ती आणि अण्वस्त्रे ह्यांच्या निर्मितीला आंतरराष्ट्रीय नियंत्रण मंडळाद्वारे आळा घालावा.

११. संघर्षाचे प्रश्न आंतरराष्ट्रीय न्यायालयाद्वारे सोडवावेत. यांचा निर्णय त्या राष्ट्रांवर बंधनकारक ठेवावा. त्या निर्णयांवर विशिष्ट बहुमताने पुनर्निर्णय देण्याचा अधिकार महासभेला असावा.

१२. वाढता दहशतवाद रोखणे, पर्यावरणाचे प्रश्न सोडविणे आणि 'एड्स' सारख्या गंभीर रोगांवर नियंत्रण करणे या उपाययोजना तातडीने अंमलात आणल्या पाहिजेत.

युद्धाचा निषेध सर्वांनीच केला पाहिजे, नाही तर भविष्यकाळामध्ये युद्ध मानवजातीचा निःपात केल्याशिवाय राहणार नाही. आपली भूमिका ही युद्धपिपासू वृत्तीची न ठेवता सहिष्णुता आणि सहकार्याची ठेवावी, तरच आपण प्रगती करू शकू.

तात्पर्य असे की, शांतता आणि सुरक्षितता निर्माण होईल असेच उपाय योजले पाहिजेत. दोष युनोचा नसून तिच्यामध्ये सदस्य असणाऱ्या बड्या स्थायी राष्ट्रांचा आहे. युनोमध्ये पुढे जर काही दोष निर्माण झाले तर तिच्या सनदेमध्ये बदल करून ते नष्ट करावेत. आज युनो हे मानवाचे सर्वश्रेष्ठ आणि संघटित आशास्थान जरूर आहे, पण तिच्या कार्याची पूर्तता करण्याची जबाबदारी सभासद राष्ट्रांनी आणि मुख्यत्वेकरून स्थायी राष्ट्रांनी प्रामाणिकपणे पार पाडली पाहिजे. आज हीच खबरदारी बाळगणे

आवश्यक आहे.

तसेच युनोची घटना तयार करून ६० वर्षे झालेली आहेत त्यात दुरुस्ती करून विशेषत: सुरक्षा परिषदेतील सत्तासंतुलन बदलले पाहिजे. आज युनोच्या सदस्य राष्ट्रांची संख्या १९१ झालेली आहे. भारत, जपान, जर्मनी आणि ब्राझील यांनी आपणास नकाराधिकाराचा (Veto) अधिकार मिळावा म्हणून प्रयत्न चालविलेले आहेत. ते विभागीय सत्तासंतुलनासाठी. या राष्ट्रांनी केलेली प्रगती व कार्य पहाता त्यांच्याकडे युनोला आता फार काळ दुर्लक्ष करून चालणार नाही. म्हणून युनोच्या कार्यात कालानुरूप योग्य ते बदल झाले पाहिजेत.

## संयुक्त राष्ट्रसंघ (UNO) ची सदस्य राष्ट्रे - (इ.स.२००४ प्रमाणे.)

| अनु. | राष्ट्राचे नाव | सदस्यता स्वीकारलेला दिवस | अनु. | राष्ट्राचे नाव | सदस्यता स्वीकारलेला दिवस |
|---|---|---|---|---|---|
| १. | अफगाणिस्तान | १९ नोव्हेंबर, १९४६ | २३. | जमैका | १८ सप्टेंबर, १९६२ |
| २. | अल्जीरिया | ८ ऑक्टोबर, १९६२ | २४. | जॉर्डन | १४ डिसेंबर, १९५५ |
| ३. | अंगोला | १ डिसेंबर, १९७६ | २५. | केनिया | १६ डिसेंबर, १९६३ |
| ४. | अर्जेंटिना | २४ ऑक्टोबर, १९४५ | २६. | कुवैत | १४ मे, १९६३ |
| ५. | ऑस्ट्रेलिया | १ नोव्हेंबर, १९४५ | २७. | लाओस जन लोकतान्त्रिक गणराज्य | १४ डिसेंबर, १९५५ |
| ६. | अजर बेजान | २ मार्च, १९९२ | २८. | लेसोथो | १७ ऑक्टोबर, १९६६ |
| ७. | बहारीन | २१ सप्टेंबर, १९७१ | २९. | लिबियान अरब जमाहिरिया | १४ डिसेंबर, १९५५ |
| ८. | बार्बाडोस | ९ डिसेंबर, १९६६ | ३०. | लक्झम्बर्ग | २४ ऑक्टोबर, १९४५ |
| ९. | बेल्जियम. | २७ डिसेंबर, १९४५ | ३१. | मालावी | १ डिसेंबर, १९६५ |
| १०. | बेनिन | २० सप्टेंबर, १९६० | ३२. | मालदीव | २१ सप्टेंबर, १९६५ |
| ११. | बोलीव्हिया | १४ नोव्हेंबर, १९४५ | ३३. | माल्टा | १ डिसेंबर, १९६४ |
| १२. | बोट्सवाना | १७ ऑक्टोबर, १९६६ | ३४. | कॅनडा | ९ नोव्हेंबर, १९४५ |
| १३. | ब्रूनी दारूस्सलाम | २१ सप्टेंबर, १९८४ | ३५. | अल्बानिया | १४ डिसेंबर, १९५५ |
| १४. | बुर्कीनाफासो | २० सप्टेंबर, १९६० | ३६. | अंझेरा | २८ जुलै, १९९३ |
| १५. | कम्बोडिया | १४ डिसेंबर, १९५५ | ३७. | एण्टीगुआ आणि बरबूडा | ११ नोव्हेंबर, १९८१ |
| १६. | गिनी | १२ डिसेंबर, १९५८ | ३८. | अर्मेनिया | २ मार्च, १९९२ |
| १७. | गयाना | २० सप्टेंबर, १९६६ | ३९. | ऑस्ट्रिया | १४ डिसेंबर, १९५५ |
| १८. | होण्डुरास | १७ डिसेंबर, १९४५ | ४०. | बाहामा | १८ सप्टेंबर, १९७३ |
| १९. | आइसलँड | १९ नोव्हेंबर, १९४६ | ४१. | बांग्लादेश | १७ सप्टेंबर, १९७४ |
| २०. | इण्डोनेशिया | २८ सप्टेंबर, १९४५ | | | |
| २१. | इराक | २१ डिसेंबर, १९४५ | | | |
| २२. | इस्रायल | ११ मे, १९४९ | | | |



| अनु. | राष्ट्राचे नाव | सदस्यता स्वीकारलेले दिवस | अनु. | राष्ट्राचे नाव | सदस्यता स्वीकारलेले दिवस |
|---|---|---|---|---|---|
| ४२. | बेलारूस | २ मार्च, १९९२ | ७६. | क्यूबा | २४ ऑक्टोबर, १९४५ |
| ४३. | बेलीज | २५ सप्टेंबर, १९८१ | ७७. | चेक गणराज्य | १९ जानेवारी, १९९३ |
| ४४. | भूतान | २१ सप्टेंबर, १९७१ | ७८. | डेनमार्क | २४ ऑक्टोबर, १९४५ |
| ४५. | बोस्निया हर्जेगोविना | २२ मे, १९९२ | ७९. | डोमिनिका | १८ डिसेंबर, १९७८ |
| ४६. | ब्राझील | २४ ऑक्टोबर, १९४५ | ८०. | इक्वेडोर | २१ डिसेंबर, १९४५ |
| ४७. | बुल्गारिया | १४ डिसेंबर, १९५५ | ८१. | अलसाल्वाडोर | २४ ऑक्टोबर, १९४५ |
| ४८. | बुरुंडी | १८ सप्टेंबर, १९६२ | ८२. | इरीट्रिया | २८ मे, १९९३ |
| ४९. | कॅमरून | २० सप्टेंबर, १९६० | ८३. | इथियोपिया | १३ नोव्हेंबर, १९४५ |
| ५०. | गिनीबिसाऊ | १७ सप्टेंबर, १९७४ | ८४. | फिजी | १३ ऑक्टोबर, १९७० |
| ५१. | हैती | २४ ऑक्टोबर, १९४५ | ८५. | फ्रान्स | २४ ऑक्टोबर, १९४५ |
| ५२. | हंगेरी | १४ डिसेंबर, १९५५ | ८६. | गाम्बिया | २१ सप्टेंबर, १९६५ |
| ५३. | भारत | ३० ऑक्टोबर, १९४५ | ८७. | जर्मनी | १८ सप्टेंबर, १९७३ |
| ५४. | इराण | २४ ऑक्टोबर, १९४५ | ८८. | यूनान | २५ ऑक्टोबर, १९४५ |
| ५५. | आयरलँड | १४ डिसेंबर, १९५५ | ८९. | ग्वाटेमाला | २१ नोव्हेंबर, १९४५ |
| ५६. | इटली | १४ डिसेंबर, १९५५ | ९०. | मॉरीशस | २४ एप्रिल, १९६८ |
| ५७. | जपान | १८ डिसेंबर, १९५६ | ९१. | मोनॅको | २८ मे, १९९३ |
| ५८. | कजाकिस्तान | २ मार्च, १९९२ | ९२. | मोरोक्को | १२ नोव्हेंबर, १९५६ |
| ५९. | किरिबाती | सप्टेंबर, १९९९ | ९३. | म्यांमार | १९ एप्रिल, १९४८ |
| ६०. | किर्गिजस्तान | २ मार्च, १९९२ | ९४. | नौरू | सप्टेंबर, १९९९ |
| ६१. | लाटविया | १७ सप्टेंबर, १९९१ | ९५. | नेदरलैण्ड (हॉलण्ड) | १० डिसेंबर, १९४५ |
| ६२. | लेबनान | २४ ऑक्टोबर, १९४५ | ९६. | निकारागुआ | २४ ऑक्टोबर, १९४५ |
| ६३. | लायबेरिया | २ नोव्हेंबर, १९४५ | ९७. | नायजेरिया | ७ ऑक्टोबर, १९६० |
| ६४. | लिचटेनस्टेन | १८ सप्टेंबर, १९९० | ९८. | ओमान | ७ ऑक्टोबर, १९७१ |
| ६५. | लिथुआनिया | १७ सप्टेंबर, १९९१ | ९९. | पालाऊ | १५ डिसेंबर, १९९४ |
| ६६. | मादागास्कर | २० सप्टेंबर, १९६० | १००. | पपुआ न्यूगिनी | १० ऑक्टोबर, १९७५ |
| ६७. | मलेशिया | १७ सप्टेंबर, १९५७ | १०१. | पेरू | ३१ ऑक्टोबर, १९४५ |
| ६८. | माली | २८ सप्टेंबर, १९६० | १०२. | पोलॅण्ड | २४ ऑक्टोबर, १९४५ |
| ६९. | मार्शल द्वीप समूह | १७ सप्टेंबर, १९९१ | १०३. | कतर | २१ सप्टेंबर, १९७१ |
| ७०. | केप वर्डे | १६ सप्टेंबर, १९७५ | १०४. | माल्डोवा गणराज्य | २ मार्च, १९९२ |
| ७१. | मध्य अफ्रिका गणतन्त्र | २० सप्टेंबर, १९६० | १०५. | रशिया महासंघ | २४ ऑक्टोबर, १९४५ |
| ७२. | चिली | २४ ऑक्टोबर, १९४५ | १०६. | सेंट किट्स व नेविस | २३ सप्टेंबर, १९८३ |
| ७३. | कोलंबिया | ५ नोव्हेंबर, १९४५ | १०७. | सेंट विन्सेंट व ग्रेनाडिनीस | १६ सप्टेंबर, १९८० |
| ७४. | कांगो | २० सप्टेंबर, १९६० | | | |
| ७५. | को-डी लवोइरी | २० सप्टेंबर, १९६० | | | |

| अनु. | राष्ट्राचे नाव | सदस्यता स्वीकारलेले दिवस |
|---|---|---|
| १०८. | साओ-टोम व प्रिंसिपी | १६ सप्टेंबर, १९७५ |
| १०९. | सेनेगल | २८ सप्टेंबर, १९६० |
| ११०. | सियरा लिओन | २७ सप्टेंबर, १९६० |
| १११. | स्लोवाक गणराज्य | १९ जानेवारी, १९९३ |
| ११२. | सोलोमन द्वीप | १९ सप्टेंबर, १९७८ |
| ११३. | दक्षिण आफ्रिका | ७ नोव्हेंबर, १९४५ |
| ११४. | चाड | २० सप्टेंबर, १९६० |
| ११५. | चीन | २४ ऑक्टोबर, १९४५ |
| ११६. | कोमोरोस | १२ नोव्हेंबर, १९७५ |
| ११७. | कोस्टारिका | २ नोव्हेंबर, १९४५ |
| ११८. | क्रोशिया | २२ मे, १९९२ |
| ११९. | साइप्रस | २० सप्टेंबर, १९६० |
| १२०. | उत्तर कोरिया | १७ सप्टेंबर, १९९१ |
| १२१. | जिबूती | २० सप्टेंबर, १९७७ |
| १२२. | डोमिनिकन गणराज्य | २४ ऑक्टोबर, १९४५ |
| १२३. | इजिप्त | २४ ऑक्टोबर, १९४५ |
| १२४. | इक्वाटोरियल गिनी | १२ नोव्हेंबर, १९६८ |
| १२५. | एस्टोनिया | १७ सप्टेंबर, १९९१ |
| १२६. | माइक्रोनेशिया संघ राज्य | १७ सप्टेंबर, १९९१ |
| १२७. | फिनलँड | १४ डिसेंबर, १९५५ |
| १२८. | गेबन | २० सप्टेंबर, १९६० |
| १२९. | जॉर्जिया | ३१ जुलै, १९९२ |
| १३०. | घाना | ८ मार्च, १९५७ |
| १३१. | ग्रेनाडा | १७ सप्टेंबर, १९७४ |
| १३२. | मारीटानिया | २७ ऑक्टोबर, १९६१ |
| १३३. | मेक्सिको | ७ नोव्हेंबर, १९४५ |
| १३४. | मंगोलिया | २७ ऑक्टोबर, १९६१ |
| १३५. | मोजाम्बिक | १६ सप्टेंबर, १९७५ |
| १३६. | नामीबिया | २३ एप्रिल, १९९० |
| १३७. | नेपाळ | १४ डिसेंबर, १९५५ |
| १३८. | न्यूझीलॅण्ड | २४ ऑक्टोबर, १९४५ |
| १३९. | नाइजर | २० सप्टेंबर, १९६० |
| १४०. | नॉर्वे | २७ नोव्हेंबर, १९४५ |

| अनु. | राष्ट्राचे नाव | सदस्यता स्वीकारलेले दिवस |
|---|---|---|
| १४१. | पाकिस्तान | ३० सप्टेंबर, १९४७ |
| १४२. | पनामा | १३ नोव्हेंबर, १९४५ |
| १४३. | परागुऐ | २४ ऑक्टोबर, १९४५ |
| १४४. | फिलिपीन्स | २४ ऑक्टोबर, १९४५ |
| १४५. | पोर्तुगाल | १४ डिसेंबर, १९५५ |
| १४६. | दक्षिण कोरिया | १७ सप्टेंबर, १९९१ |
| १४७. | रोमानिया | १४ डिसेंबर, १९५५ |
| १४८. | रुआंडा | १८ सप्टेंबर, १९६२ |
| १४९. | सेंट लूसिया | १८ सप्टेंबर, १९७९ |
| १५०. | सामोआ | १५ डिसेंबर, १९७६ |
| १५१. | सैन मैरीनो | २ मार्च, १९९२ |
| १५२. | सौदी अरब | २४ ऑक्टोबर, १९४५ |
| १५३. | सेशेल्स | २१ सप्टेंबर, १९७६ |
| १५४. | सिंगापूर | २१ सप्टेंबर, १९६५ |
| १५५. | स्लोवेनिया | २२ मे, १९९२ |
| १५६. | सोमालिया | २० सप्टेंबर, १९६० |
| १५७. | स्पेन | १४ डिसेंबर, १९५५ |
| १५८. | श्रीलंका | १४ डिसेंबर, १९५५ |
| १५९. | सूरीनाम | ४ डिसेंबर, १९७५ |
| १६०. | स्वीडन | १९ नोव्हेंबर, १९४६ |
| १६१. | तजाकिस्तान | २ मार्च, १९९२ |
| १६२. | मेसेडोनिया पूर्व यूगोस्लावी गणराज्य | ८ एप्रिल, १९९१ |
| १६३. | त्रिनिदाद टोबागो | १८ सप्टेंबर, १९६२ |
| १६४. | तुर्की | २४ ऑक्टोबर, १९४५ |
| १६५. | युगांडा | २५ ऑक्टोबर, १९६२ |
| १६६. | संयुक्त अरब अमीरात | ९ डिसेंबर, १९७१ |
| १६७. | तंजानिया संयुक्त गणराज्य | १४ डिसेंबर, १९६१ |
| १६८. | उरुग्वे | १८ डिसेंबर, १९४५ |
| १६९. | वानूआतू | १५ सप्टेंबर, १९८१ |
| १७०. | वियतनाम | २० सप्टेंबर, १९७७ |
| १७१. | युगोस्लाविया | २४ ऑक्टोबर, १९४५ |
| १७२. | झाम्बिया | १ डिसेंबर, १९६४ |
| १७३. | तुवालु | सप्टेंबर, २००० |



| अनु. | राष्ट्राचे नाव | सदस्यता स्वीकारलेले दिवस |
|---|---|---|
| १७४. | सूडान | १२ नोव्हेंबर, १९५६ |
| १७५. | स्वित्झरलॅण्ड | जानेवारी, २००२ |
| १७६. | सीरिया अरब-गणराज्य | २४ ऑक्टोबर, १९४५ |
| १७७. | थाईलॅण्ड | १६ डिसेंबर, १९४६ |
| १७८. | टोगो | २० सप्टेंबर, १९६० |
| १७९. | टोंगा | सप्टेंबर, १९९९ |
| १८०. | ट्यूनीशिया | १२ नोव्हेंबर, १९५६ |
| १८१. | तुर्कमेनिस्तान | २ मार्च, १९९२ |
| १८२. | युक्रेन | २४ ऑक्टोबर, १९४५ |

| अनु. | राष्ट्राचे नाव | सदस्यता स्वीकारलेले दिवस |
|---|---|---|
| १८३. | संयुक्त साम्राज्य (यू.के.) | २४ ऑक्टोबर, १९४५ |
| १८४. | संयुक्त राज्य अमेरिका (यू. एस. ए.) | २४ ऑक्टोबर, १९४५ |
| १८५. | उजबेकिस्तान | २ मार्च, १९९२ |
| १८६. | वेनेजुएला | १५ नोव्हेंबर, १९४५ |
| १८७. | यमन | ३० सप्टेंबर, १९४७ |
| १८८. | जायरा | २० सप्टेंबर, १९६० |
| १८९. | जिम्बाब्वे | २५ ऑगस्ट, १९८० |
| १९०. | ताईवान | |
| १९१. | व्हेटिकन सिटी | |

अशा प्रकारे जगातील राष्ट्रांची संख्या आज १९१ आहे. तैवान व व्हॅटिकन सिटी ही दोन राष्ट्रे तटस्थ व आमंत्रित राष्ट्रे आहेत. फारच लहान राष्ट्रे आहेत. ''व्हॅटिकन सिटी'' हे तर इटलीतील ''पोपचे पवित्र घर'' म्हणून केवळ १०० एकर क्षेत्र असणारे जगातील सर्वात लहान राष्ट्र आहे.

★★